रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ७९
www.ramprahar.com
सोमवार, ६ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## कार्तिकी यात्रेनिमित्त पंढरपुरात विठ्ठलाचे २४ तास दर्शन



**पंढरपूर :** कार्तिकी यात्रेला राज्यासह परराज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात. या भाविकांना सर्व सुविधा मंदिर समिती देणार आहे. कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर २६ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत देवाचे अर्थात विठ्ठल रखुमाईचे दर्शन २४ तास राहणार आहे, अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथमहाराज औसेकर यांनी दिली. दरम्यान, कार्तिकी एकादशी २ नोव्हेंबर रोजी आहे. कार्तिकी यात्रा पूर्वनियोजनाबाबत मंदिर समितीची बैठक श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे झाली. या वेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष औसेकरमहाराज म्हणाले, रविवार २ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजून २० मिनिटांनी राज्याचे उपमुख्यमंत्रीमहोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा होणार आहे. २६ ऑक्टोबरपासून २४ तास दर्शन उपलब्ध असेल.

अंतरंग
माणगाव उंबर्डीतील मुलीचा पाण्याच्या प्रवाहात मृत्यू/२
लैंगिक अत्याचारातून गर्भवती मुलगी प्रसूत; तरुणास अटक/६
रायगडच्या आर्यन देशमुखची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड/८

# पूरग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करणार

## केंद्रीय मंत्री अमित शाह यांची ग्वाही

**शिर्डी : प्रतिनिधी**

अतिवृष्टी व पुरामुळे महाराष्ट्रातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून महाराष्ट्र शासनाकडून नुकसानीचा तपशीलवार अहवाल मिळताच केंद्र सरकार क्षणाचाही विलंब न करता शेतकऱ्यांसाठी भरीव मदत जाहीर करेल, अशी ग्वाही केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि. ५) दिली.

लोणी येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या नूतनीकरण शुभारंभ



सोहळ्यात केंद्रीय मंत्री शाह बोलत होते.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले, केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी तीन हजार १३२ कोटींची मदत मंजूर केली आहे. यापैकी एप्रिलमध्ये एक हजार ६३१ कोटी वाटप करण्यात आले असून यात महाराष्ट्रासाठी २१५ कोटींचे विशेष मदत पॅकेज देण्यात आले आहे. कर्जवसुलीवर तात्पुरती स्थगिती व विद्यार्थ्यांसाठी परीक्षांमध्ये सवलती यांसारखे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. **(पान २ वर..)**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वसतिगृहाच्या इमारतीचे कोनशिला अनावरण

## पुढील टप्प्यासाठी आणखी २५ लाखांच्या निधीची घोषणा





**सातारा : रामप्रहर वृत्त**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाने सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीतून लोकस्मृती वसतिगृह योजना हाती घेतली असून या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे दर्जेदार बांधकाम पूर्ण झाले आहे. या वसतिगृहाच्या पुढील टप्प्यासाठी आणखी २५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, विद्यापीठाचे माजी विद्यार्थी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. ४) केली.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या इमारतीचे ऑनलाईन पद्धतीने कोनशिला अनावरण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सातारा येथे झाले. या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, लोकस्मृती वसतिगृहाच्या बांधकामाची ध्वनीचित्रफीत पाहिल्यावर या कामाचा दर्जा आणि विद्यापीठाची विद्यार्थिनींप्रती असलेली उदात्त भावना स्पष्ट जाणवते. विद्यार्थिनींसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरेल. पुढील टप्प्याचे कामही समाजातील दातृत्वातून सहज मार्गी लागेल. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यापूर्वीही या वसतिगृहासाठी २५ लाखांचा निधी दिला होता, ज्याचा विनियोग विद्यापीठाने यशस्वीरित्या केला. या वेळी विविध देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

# स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठानच्या लोगोचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अनावरण

## पुण्यस्मरणानिमित्त रक्तदान आणि आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका स्व. मुग्धा गुरूनाथ लोंढे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पनवेलमधील विरूपाक्ष मंगल कार्यालयात रविवारी (दि.५) रक्तदान आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले हाते. या वेळी स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठानच्या लोगोचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.



या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारूशीला घरत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते व माजी नगरसेवक श्रीनंद पटवर्धन, **(पान २ वर..)**

## भूस्खलनामध्ये २० जणांचा मृत्यू

**दार्जिलिंग :** उत्तराखंडनंतर आता पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगमध्ये भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. या भूस्खलनात आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी आहेत.

या नैसर्गिक आपत्तीमुळे दार्जिलिंग परिसरात प्रमुख रस्ते बंद झाले आहेत. स्थानिक लोक आणि स्वयंसेवकांच्या मदतीने बचाव आणि मदतकार्य सुरू आहे, मात्र सततच्या पावसामुळे अडथळे येत आहेत. दरम्यान, दार्जिलिंगमधील आपत्तीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवेदना व्यक्त करून आम्ही तुमच्यासोबत असल्याचे म्हटले आहे.

# गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी साताऱ्यात मोफत कोर्सची सुविधा



**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था आणि मराठा बिझनेस फोरम शिवनेरी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन कोर्सला सुरुवात करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना फी भरून कोचिंग घेणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम मोठे वरदान ठरणार आहे. या उपक्रमाच्या उद्घाटन समारंभाला यासाठी निधी देणारे 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मोठा अधिकारी व्हायचे असेल तर यूपीएससी व एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. या परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि योग्य मार्गदर्शनाची गरज असते. गरीब घरातील मुलगा किंवा मुलगीसुद्धा या परीक्षेत उत्तीर्ण होऊन मोठा अधिकारी बनू शकतो हे अनेकांनी सिद्ध केले आहे. याच पार्श्वभूमीवर सातारा येथे सुरू करण्यात आलेल्या या मोफत मार्गदर्शन केंद्रात मजूर वर्गातील विद्यार्थ्यांची मुले शिकत आहेत.

अनुभवी मार्गदर्शकांकडून सखोल व दर्जेदार मार्गदर्शन या कोर्समध्ये दिले जाणार असून यूपीएससी व एमपीएससी परीक्षांसाठी आवश्यक विषय, अभ्यास पद्धती, वेळ व्यवस्थापन आणि मुलाखत तयारी यावर विशेष भर दिला जाणार आहे. **(पान २ वर..)**



**उरण : केगाव ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य योगिता पंकज ठाकूर आणि विद्यमान सदस्य रजनी गणेश पाटील यांनी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत उरण कार्यालय येथे भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. यामुळे काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला तेथे धक्का बसला आहे. आमदार महेश बालदी यांनी दोन्ही सदस्यांचे पक्षात स्वागत करून शुभेच्छा दिल्या. पक्षप्रवेशावेळी भाजप चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, केगाव ग्रामपंचायतीचे सदस्य अविनाश पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

## जंजिरा किल्ल्याचे दरवाजे खुले

### पर्यटकांसह स्थानिकांची प्रतीक्षा संपली

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याचे दरवाजे पावसाळ्यानंतर रविवारी (दि. ५) उघडण्यात आले. त्यामुळे पर्यटकांसह येथील पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या स्थानिकांची प्रतीक्षा संपली आहे.



पावसाळ्यात शासनाकडून पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जंजिरा किल्ल्याचे दरवाजे बंद करण्यात येत असतात. मान्सूनचा कालावधी सरल्यानंतर किल्ल्याची साफसफाई करून पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यांच्या हस्ते किल्ला खुला करण्यात आला आहे. **(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**




।। श्री गणेशाय नम ।। ।। राधा कृष्ण ।। ।। जय हनुमान ।।

उदघाटन सोहळा

आपणास निमंत्रीत करताना अत्यंत हर्ष होत आहे की, **लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब** यांच्या स्वनिधीतुन मौजे शिवाजीनगर गावातील रस्ता काँक्रिटीकरण, अंतर्गत आर.सी.सी. गटार व नविन पिण्याच्या पाण्याची लाईनचे काम पूर्ण झाले असून, सोमवार दि.०६/१०/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उदघाटन सोहळा आयोजित केला आहे, तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

शुभहस्ते

**लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब**
माजी खासदार - रायगड
**श्री. अविनाश कोळी साहेब**
भाजपा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष

प्रमुख पाहुणे

**मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर साहेब** (आमदार पनवेल विधानसभा)
**मा. श्री. महेशशेठ बालदी साहेब** (आमदार उरण विधानसभा)
**मा. श्री. जे.एम.म्हात्रे साहेब** (माजी नगराध्यक्ष पनपा)
**मा. श्री. महेंद्रशेठ घरत** (अध्यक्ष रा.जि.कॉंग्रेस)
**मा. श्री. अरुणशेठ भगत साहेब** (महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य)
**मा. सौ. रत्नप्रभा घरत** (माजी पंचायत समिती सदस्या)
**मा. श्री. परेशदादा ठाकूर साहेब** (माजी सभागृह नेते प. महानगरपालिका)
**मा. श्री. कृष्णाशेठ ठाकूर** (अध्यक्ष ग्रामस्थ मंडळ शिवाजीनगर)

आपले नम्र

**ग्रामस्थ मंडळ - शिवाजीनगर**

# शक्ती चक्रीवादळाच्या इशाऱ्याने मच्छीमार नौका किनारी; मासेमारी ठप्प

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकण किनाऱ्यावर निसर्गाने पुन्हा एकदा रौद्ररूप धारण केले आहे. सलग वादळे, वादळी वारे आणि समुद्राच्या अनिश्चित स्वभावाने रायगडातील मच्छिमार बांधवांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे.

समुद्र अजूनही प्रचंड धोकादायक बनला असून, मासेमारी पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी श्रीवर्धन तालुक्यातील मच्छिमारांचा यंदाचा हंगाम जणू उद्ध्वस्त झाल्याचे चित्र स्पष्ट दिसते.

दरवर्षी शासनाने १ जून ते ३१ जुलैपर्यंत मासेमारी बंदी लागू केली असते, मात्र यावर्षी पावसाचा आणि वाऱ्यांचा कहर १५ मेपासूनच सुरू झाल्याने अनेक मच्छिमारांनी आपल्या बोटी आधीच किनाऱ्यावर ओढल्या. १ ऑगस्ट रोजी मासेमारी हंगामाला सुरुवात झाली तेव्हाच पुन्हा निसर्गाने कोप दाखवला.

केवळ दोन महिन्यांच्या अवधीतच चार ते पाच वादळांनी कोकण किनाऱ्याला तडाखा दिला असून, आता पुन्हा शक्ती या चक्रीवादळाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. या सलग संकटामुळे भरटखोल, मेंदडी, दिघी, श्रीवर्धन, बागमंडला, जीवना बंदर, दांडा कोळिवाडा, मुळगाव, वाशी, कुडगाव, आदगाव, शेखाडी, आगरदांडा, दिवेआगर या किनारी गावांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

**आर्थिक फटका**



समुद्रात गेलं की जीव धोक्यात असतो. वादळ कधी येईल सांगता येत नाही. दोन दिवस समुद्रात गेलो, पण मासे नाहीत. लेकरं भुकेली, घरात अन्न नाही, आणि हातात काही नाही!मोठ्या बोटींचं नुकसान झालं, डिझेल महाग झालं, बर्फही दुर्मिळ झालंय. समुद्र आता आमचा आधार नाही – आमचं संकट बनलंय!

मासेमारी थांबल्यामुळे आमच्या बायकांच्या हातात मासे नाहीत, विक्री नाही, आणि घरात फक्त कर्जाचं ओझं आहे! वादळ थांबत नाही आणि मासे मिळत नाहीत – ही दुहेरी झळ प्रत्येक किनारी गावाला बसली आहे.

समुद्रात मासेमारीला जाता येत नाही; गेलं तरी मासे मिळत नाहीत. डिझेल, बर्फ, अन्नसामुग्री यांचा खर्च प्रचंड वाढला आहे.बोटींची दुरुस्ती, कर्जफेड, बँक हप्ते – सर्वांवर आर्थिक ताण. मच्छी विक्री ठप्प; महिला मच्छीविक्रेत्या व छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला आहे.

शासनाने तातडीने सानुग्रह आर्थिक पॅकेज जाहीर करून, डिझेल सवलत लागू करावी, जाळी व बोटी दुरुस्तीसाठी अनुदान मिळावे, तसेच कर्जसवलतीसह आपत्ती निवारक निधीतून थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मच्छिमारांची एकमुखी मागणी आहे.

या गंभीर परिस्थितीकडे रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे आणि राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा मच्छिमार बांधवांनी व्यक्त केली आहे.

**वादळांनी आमचं आयुष्य विस्कळीत केलं आहे. समुद्रात गेलो तरी मासे नाहीत, डिझेल, बर्फ आणि जेवणासाठी लागणारा साहित्याचा खर्च वाढला आहे. खलाशीवर्गाचे पगारही सुटत नाही. घरातील भूक आणि कर्जाचं ओझं दिवसागणिक वाढत चाललंय. आमच्या संकटाकडे शासनाने तातडीने दखल घ्यावी आणि सानुग्रह अनुदान द्यावे, अशी आमची मागणी आहे.**

**– हरिओम चोगले,**
**मच्छीमार नेते, भरडखोल**

## सभापती आरक्षण सोडतीसाठी ९ ऑक्टोबरला विशेष सभा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक–२०२५ करिता राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडून पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील १५ पंचायत समित्यांचे सभापती पदाचे आरक्षण अडीच वर्षाच्या कालावधीकरिता खालील प्रवर्गाप्रमाणे निश्चित करुन देण्यात आले आहे.

अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ० आहे. अनुसूचित जातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे. अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे. अनुसूचित जमातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या १ आहे.

नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या २ आहे. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या २ आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ४ आहे.

सर्वसाधारण प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापती पदांची संख्या ४ आहे. तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे दि.९ सप्टेंबर २०२५ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे १५ पंचायत समित्यांचे सभापती आरक्षण निश्चित करण्यासाठी जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता विशेष सभा अयोजित करण्यात आली आहे. तरी रायगड जिल्ह्यातील नागरिक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या आरक्षण सोडत सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# दिवाळीनिमित्त कोकण रेल्वे 30 अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार

**पनवेल–चिपळूण–पनवेल अनारक्षित विशेष गाडी**

**रोहा : प्रतिनिधी**

दिवाळी उत्सवानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे ३० अतिरिक्त विशेष गाड्या चालवणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव – लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष व पुणे – दानापूर – सुपौल एक्सप्रेस बदललेल्या गाडी क्रमांकासह धावणार आहे.रेल्वेच्या विशेष गाड्यांमध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव – लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (६ सेवा) गाडी क्रमांक ०११४५ साप्ताहिक विशेष गाडी सोमवार दि. ६ ते १३.व २० ऑक्टोबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ०८.२० वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी २२.४० वाजता पोहोचेल. (३ सेवा), गाडी क्रमांक ०१००४ साप्ताहिक विशेष गाडी रविवार दि. ५, १२. व १९.ऑक्टोबर रोजी मडगाव येथून १६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे ०६.२० वाजता पोहोचेल. (३ सेवा)

या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेर्डी, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अदावली, वीलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थीवी आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

पनवेल – चिपळूण – पनवेल अनारक्षित विशेष (२४ सेवा) गाडी क्रमांक ०११५९ अनारक्षित विशेष गाडी ०३.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ पर्यंत प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवार रोजी पनवेल येथून १६.४० वाजता सुटेल आणि चिपळूण येथे त्याच दिवशी २१.५५ वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक

०११६० अनारक्षित विशेष गाडी ०३.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ पर्यंत प्रत्येक शुक्रवार, शनिवार व रविवार रोजी चिपळूण येथून ११.०५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

या गाडीला सोमाटणे, आपटा, जीते, पेन, कासु, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कलांबणी बु.दु., खेर्डी आणि अंजनी हे थांबे देण्यात आले आहेत.

# जीएसटीबाबत आमदार मंदा म्हात्रेंनी व्यापाऱ्यांशी साधला संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेवरून देशात जीएसटीमध्ये आमूलाग्र बदल करत दरकपात करण्यात आली. सुमारे ९० टक्के जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी आकारणी ही १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर आ. मंदा म्हात्रे यांच्या पुढाकाराने व विनोद देसाई राज्यकर सहआयुक्त वस्तू व सेवा कर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली जीएसटी करप्रणालीतील बदल आणि दरकपाती संदर्भात व्यापारी व ग्राहकांसमवेत शनिवार रोजी वाशी येथील ग्रोमा हाऊसमध्ये मार्गदर्शन बैठक झाली.

डॉ. राजेश पाटील व अध्यक्ष ग्रोमा संघटना भीमजी भानुशाली यांचे प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत व्यापारी वर्ग व नागरिकांनी सहआयुक्त यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून करप्रणालीत झालेले आमूलाग्र बदल, त्यांचे परिणाम आणि दरकपातीमुळे मिळणारे फायदे याविषयी सविस्तर माहिती मिळवली. आ. मंदा म्हात्रे म्हणाल्या की, जीएसटीमध्ये केलेली कपात ही केवळ आर्थिक सुधारणा नाही तर सामान्य माणसाच्या खिशाला दिलासा देणारे आणि व्यापार क्षेत्राला नवसंजीवनी देणारे ऐतिहासिक पाऊल आहे.

यामुळे लघु व मध्यम उद्योगांना मोठा हातभार लागणार आहे. जीएसटीमधील कपात ही गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबं आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी थेट दिलासा आहे. मा. मोदीजींचं नेतृत्व हे केवळ निर्णयक्षम नाही तर दूरदृष्टी दाखवणारं नेतृत्व आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक सुधारणांचा प्रवास हा जनसामान्यांच्या हिताला प्राधान्य देत सुरू आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना बचत, व्यापाराला गती आणि रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

सदर बैठकीत व्यापारी, व्यावसायिक ग्राहक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी आपल्या शंका उपस्थित केल्या व त्या मार्गदर्शनाने दूर करण्यात आल्या. या उपक्रमामुळे करसंबंधी पारदर्शकता वाढण्यास मदत होईल आणि व्यापारी वर्गाला व्यवसाय सुलभ करतानाच ग्राहकांनाही दिलासा मिळेल असे स्पष्ट केले. अशा मार्गदर्शन बैठकींची गरज असुन पुढेही अशा उपक्रमांद्वारे माहिती व जनजागृती केली जाईल असे हि आ. मंदा म्हात्रे सांगितले.

## माणगाव उंबर्डीतील मुलीचा पाण्याच्या प्रवाहात मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील उंबर्डी गावच्या हद्दीत काळ नदीत शनिवारी सायंकाळी दुर्दैवी घटना घडली. अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहात ११ वर्षीय मुलगी वाहून जाऊन तिचा मृत्यू झाला.

शनिवारी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास आश्विनी गेनु ढेबे वय११,रा. गडले दुधवान,ता. मुळशी,जि. पुणे ही आपल्या आजी सोबत गुरे आणण्यासाठी शेतात गेली होती ती परत येत असताना नदीचे पात्र ओलांडत असतांना पाण्याचा प्रवाहाच्या वेगाने आश्विनीचा तोल जाऊन ती पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. ग्रामस्थांनी शोधल्या नंतर ती बेशुद्ध अवस्थेत मिळून आली. तिला तात्काळ माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला

# मुंबई–गोवा महामार्गावर माणगाव येथे वाहनांच्या रांगा

**माणगाव : प्रतिनिधी**



दसऱ्याच्या सुट्टीनंतर कोकणातून परतीच्या प्रवासाला निघालेल्या हजारो पर्यटकांमुळे रविवारी मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. विशेषतः महाडकडून माणगावच्या दिशेने वाहनांची लांबलचक रांगा ३ किलोमीटर पर्यंत लागल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. दिवसभर उन्हात अडकलेल्या वाहन चालकांनी आणि प्रवाशांनी संताप व्यक्त केला. शनिवार – रविवारी सुट्टीचा शेवटचा दिवस आणि दसऱ्या नंतर कोकणवासीय तसेच पर्यटक मुंबई, पुण्याकडे परतीच्या प्रवासाला निघाल्याने महामार्गावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात झाली होती. ही वाहतूक कोंडी माणगावकर नागरिक तसेच पर्यटक व कोकणवासी यांच्या चांगलीच मुळावर आली आहे. ती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांची चांगलीच दमछाक झाली.

माणगाव शहरा जवळील व इंदापूर परिसरातील बायपासचे कामे अपूर्ण असल्याने या शहरावर वाहतुकीचा ताण पडत आहे. त्यामुळे दिवसभर वाहनांची मोठी गर्दी झाली होती. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी व महामार्ग वाहतूक पोलीस सकाळ पासूनच रस्त्यावर उतरले होते. वाहनांना पर्यायी मार्गाने वळवणे, मोठ्या वाहनांना थांबवणे आणि वाहतुकीचे नियमन करणे या कामात पोलीस दिवसभर गुंतले होते. मात्र वाढत्या गर्दीमुळे त्यांची अक्षरशः दमछाक झाली. काही ठिकाणी वाहनचालकांनी दुहेरी रांगा केल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली. यामुळे काही वेळा रस्ता पूर्णपणे ठप्प झाला.

अखेर पोलीस आणि स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने सायंकाळपर्यंत कोंडी हळूहळू सैल झाली.

पान १ वरुन

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करणार

भारताला जगात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी या दिवाळीत आपण सर्वांनी एकत्र येऊन घरात कोणतीही परदेशी वस्तू आणणार नाही असा संकल्प करावा. देशातील १४० कोटी लोकांनी व व्यापाऱ्यांनी 'मेक इन इंडिया'चा अंगीकार केला, तर २०४७पूर्वी भारत जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल, असेही ना. शाह यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र सहकाराची पंढरी आहे. या क्षेत्राच्या विकासाचे श्रेय डॉ. विठ्ठलराव विखे–पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांना जाते. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे–पाटील यांनी सहकार चळवळ पुढे नेण्यासोबत जलसंवर्धन चळवळ महाराष्ट्रात रूजविण्याचे कार्य केले. राज्य शासनाने त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविण्याचा आणि त्यातून राज्यातील दुष्काळ दूर करण्याचा निश्चय केला आहे.

सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राची वेगाने वाटचाल सुरू आहे. जुन्या परंपरा आणि नवतंत्रज्ञान, नवसंशोधन याची सांगड घालण्याचा प्रयत्न होत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले, तर उपमुख्यमंत्री पवार यांनी, सहकाराच्या प्रवासाला एक नवीन दिशा देणारा हा एक महत्वाचा क्षण आहे, सहकारच्या शतकातले एक सुवर्णपान आहे, असे नमूद केले. प्रास्ताविक पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी केले.

या वेळी प्रवरा उद्योग समूहाच्या वतीने राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

कार्यक्रमाला भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार सर्वश्री रवींद्र चव्हाण, शिवाजीराव कर्डिले, मोनिका राजळे, अमोल खताळ, आशुतोष काळे, किरण लहामटे, विक्रम पाचपुते, विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे–पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के–पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे–पाटील आदी उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वसतिगृहाच्या इमारतीचे कोनशिला अनावरण

कार्यक्रमास प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजित कोळेकर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. वैशाली सावंत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

## स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठानच्या लोगोचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अनावरण

माजी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, डॉ. सुरेखा मोहकर, सारिका भगत, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष रूचिता लोंढे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमित ओझे, चिन्मय समेळ, प्रतीक बहिरा, स्वप्नील ठाकूर, गुरूनाथ लोंढे, केदार भगत, संजय जैन यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, आपण वर्षभर वेगवेगळ्या कार्यक्रमांना उपस्थित राहतो. अनेक उपक्रम सेवा भावनेतून राबवले जातात. हा कार्यक्रम आपल्या सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा आहे. या प्रसंगी आपण सगळेजण भावूक होतो. मुग्धाताईंचे अचानक जाणे हे आजही आपल्यासाठी वेदनादायी आहे. त्यांच्या स्मृती पुढे जागवत असताना त्या नेहमीच सर्वांना मदतीचा हात देत असत याच सेवाभावातून स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. या प्रतिष्ठानतर्फे राबवण्यात येणारे समाजोपयोगी उपक्रम आणि कार्यक्रम वर्षभर लोकांपर्यंत पोहचले पाहिजेत हीच मुग्धाताईंना खरी श्रद्धांजली ठरेल.

रक्तदान आणि आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेकांनी स्व. मुग्धा लोंढे यांच्या सामाजिक कार्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी रक्तदान केले. समाजकारणाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या सेवाभावाचे स्मरण या निमित्ताने करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान अमित ओझे यांचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. हा उपक्रम युवानाद ढोल पथक, कच्छ युवक संघ आणि कन्या आरोग्य मंदिर यांच्या सहकार्याने यशस्वीपणे झाला.

## गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी साताऱ्यात मोफत कोर्सची सुविधा

या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, मी स्वतः साताऱच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी कॉलेजमध्ये १९६८ ते १९७२ या काळात चार वर्षे शिक्षण घेतले आहे. त्यामुळे या कॉलेजबद्दल माझ्या मनात विशेष आदर आणि प्रेम आहे. या कॉलेजमधून तुम्हाला अशा प्रकारचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे याचा मला अभिमान आहे. गेल्या वर्षी मी या कॉलेजला अर्थसहाय्य केले होते आणि यंदाही मी आर्थिक मदत करणार आहे.

जीवनात यश–अपयश येतं असतं, पण आपण आपल्या डोळ्यासमोर एक ठाम ध्येय ठेवून त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, तर यश नक्कीच मिळते, असेही त्यांनी सांगितले.

या उपक्रमाच्या उद्‌घाटन समारंभास छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य राजेंद्र मोरे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, अरुण पवार, दिलीप देशमुख, किरण पाटील, मनोज देशमुख, वैभव सणस, रोशन पाटील, राजेंद्र साबळे, अमोल अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रकने दिलेल्या धडकेत शंकरलाल संतलाल यादव (वय ३६) याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी ट्रक क्रमांक एम एच ४६ एच ०५३५ वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. शंकरलाल यादव हा जासई येथे राहत असून तो मूळचा तेजपूर, इलाहाबाद, उत्तर प्रदेश येथील आहे.पाडेघर, जेएनपीटी रोड पनवेल येथे चंदन कुमार यांचा ट्रक क्रमांक एम एच १५ जेडब्ल्यू ७६६५ हा वॉशिंग सेंटरमध्ये धुण्यासाठी आला होता. या वेळी चंदन कुमार यांनी शंकरलालला मदतीसाठी बोलावले. शंकरलाल हा कंटेनरचा मागचा दरवाजा उघडण्यासाठी गेला असता पाठीमागील ट्रकने त्याला धडक दिली. आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

### कोजागरीनिमित्त दांडिया रास

**पनवेल :** एकता मित्र मंडळ युगांतक कॉलनी, सुकापुर यांच्यातर्फे ६ ऑक्टोबर रोजी कोजागरी पौर्णिमेनिमित्ताने एक दिवसीय दांडिया रासचे आयोजन करण्यात आले आहे. निंबेश्वर कुंज, गणेश मंदिरासमोर, भारतीय जनता पक्ष कार्यालय, सुकापूर येथे या एक दिवसीय दांडिया रासचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत दांडिया रास आणि मसाला दूध वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अमित जाधव, जिल्हाध्यक्ष उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा भाजपा यांनी केले आहे.

### कामावर निघून गेलेला तरुण बेपत्ता

**पनवेल :** बापदेववाडी, पो. वाजे येथून एक व्यक्ती कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस



ठाण्यात करण्यात आली आहे. त्याचे नाव सुनिल सुधाकर शिरसाठ (वय २५) असे असून शरीर बांधा सडपातळ, रंग सावळा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चहरा गोल, उंची पाच फुट आठ इंच, अंगात नेसुन पिवळा शर्ट त्यावर हिरव्या पानांचे चित्र, निळी फुल पॅन्ट, भाषा मराठी बोलतो. कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो. शिपाई लक्ष्मण वारगुडे (७२७६६०१४२२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी

**पनवेल :** शॉपचे शटर उचकटून टेबलावर ठेवलेले लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात एक ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रोहित गुगळे हे खारघर, सेक्टर २७ येथे राहत असून त्यांचा आर जी डिस्ट्रीब्युटर्स नावाचे सेक्टर दोन खारघर येथे शॉप आहे. त्यांनी शॉप मध्ये लॅपटॉप आणि मोबाईल ठेवले होते. शटर उचकटून चोरांनी दोन लॅपटॉप आणि तीन मोबाईल चोरून नेले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन अज्ञात व्यक्ती तोंडाला मास्क लावलेले दिसून आले.

# न्हावा-शिवडी सेतूवरून साहित्याची चोरी

**उरण : प्रतिनिधी**

देशातील सर्वात लांबीच्या सागरी सेतू असलेल्या न्हावा-शिवडी सेतूवरून सुमारे १५ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे साहित्य चोरी झाल्याची धक्का दायक बाब उघडकीस आली आहे. याबाबत उरण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार २० जानेवारी २०२४ ते १३ ऑगस्ट २०२५ या कालावधीत हा गुन्हा घडला असून या पुलाच्या पॅकेज- ३ मधील जासई ते चिर्लेदरम्यान लावण्यात आलेले सात स्किसस कंट्रोलर डोअर आणि इतर किंमती साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. या चोरीतील साहित्याची एकूण किंमत १५ लाख एक हजार १७१ रुपये एवढी असल्याचे दाखल तक्रारीत नमुद आहे. या पुलाच्या बांधकामाची जबाबदारी असलेल्या लार्सन अँड टूर्बो कंपनीच्या वतीने राजेंद्र तुकाराम मोहिते यांनी ही तक्रार उरण पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

मोहिते यांच्या तक्रारीनुसार १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ते आपल्या सहकाऱ्यासोबत पुलावरील स्किसस कंट्रोल डोअ सिंकरोनायझेशनच्या कामासाठी गेले असता, त्यांना १५८ पैकी सात डोअर आणि त्या सोबतचे लॉक्स, ऍडप्लर्स, कंट्रोलर्स,सेन्सर्स आणि अन्य इतर साहित्य गायब झाल्याचे निदर्शनात आले. कंपनीने सदरचे डोअर २० जानेवारी २०२४ रोजी बसविले होते. याशिवाय त्या पुलाची देखभालिची जबाबदारी ५ जानेवारी २०२६पर्यंत कंपनीकडेच आहे.

चोरी करण्यात आलेल्या साहित्यामध्ये स्किसस कंट्रोलर डोअर, लॉक्स, ऍडप्लर्स, सेन्सर्स अकझिट, स्विचेसआणि डोअर हॅन्डल्स आदींचा समावेश आहे. या घटनेमुळे या महत्वपूर्ण पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या घटनेबाबत उरण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय साहितेच्या ३०३(२) कलम कायद्यानुसार गुन्हा दाखल करून उरण पोलीस ठाण्याचे निरीक्षक योगेश गायकवाड यांचे पोलीस पथक या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## सीकेटी विद्यालयात इंग्रजी, गणित मॅरेथॉनसह रांगोळी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागाने विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित मॅरेथॉन तसेच पालकांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.४) आयोजित करण्यात आला. या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षा प्रिया काशिद, सहसचिव स्नेहल सूर्यवंशी, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी हे उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी शाळेच्या आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा, शाळेच्या उत्तम कामगिरीचा तसेच लोकनेते लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अतुलनीय कार्याचा उल्लेख केला.



### विजेत्या स्पर्धकांची नावे

**गणित मॅरेथॉन : १) वैभव प्रमोद भारती (श्री.बापूसाहेब डी डी विसपुते प्रायमरी इंग्लिश स्कूल, दिवस, विचुंबे), २) ईशी दुबे विनयप्रकाश (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर), ३) वंशिका बोरकर (न्यू होरायझन स्कूल, खांदा कॉलनी, नवीन पनवेल) इंग्रजी मॅरेथॉन : १) मान्यता अनुमोलू (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर), २) संजना राजू चौधरी (एम एन आर, इंटरनॅशनल स्कूल), ३) ईश्वरी उमेश खाडे (सी. के.ठाकूर इंग्लिश सेकंडरी स्कूल, नवीन पनवेल), रांगोळी स्पर्धेचे विजेते १) रुपाली जयेंद्र पेटकर, २) दक्षता यतीन पाटील, ३) श्रद्धा तांबोळी**

विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्रे आणि चषक देऊन गौरविण्यात आले. परीक्षक मंगेश खुटारकर यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या गुणी, दानी आणि हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचे वर्णन करून त्यांच्याबद्दलचा आदर आपल्या सर्वांच्या मनात होता आहे आणि कायम राहील हे नमूद केले.

सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले. गायत्री पाटील मॅडम, महेश पोपेटा, स्नेहा पाटील, संगीत शिक्षक रुपेश मढवी, तबला वादक खरे सर यांचे सहकार्य लाभले. सहभागी व विजेत्यांचे प्रमाणपत्र चैताली सुर्वे यांनी लिहिले. आभार सरोज जितेकर यांनी मानले.

## केएलई महाविद्यालयात व्याख्यान, प्रश्नमंजूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह राज्यात ३ ते ९ ऑक्टोबर या दरम्यान साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने शनिवारी (दि.४) केएलई सोसायटी सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कळंबोली येथे 'अभिजात मराठी भाषा संवर्धन' या विषयावर व्याख्यान व प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह अंतर्गत महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने आज केएलई सोसायटी सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कळंबोली येथे 'अभिजात मराठी भाषा संवर्धन' या विषयावर व्याख्यान व प्रश्नमंजूषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सुमारे ९६ विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. या वेळी प्राचार्य डॉ. विजय मेंडुलकर, प्रकल्प अधिकारी अरविंद साबळे आणि शितल घरवे उपस्थित होते.

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत महापालिका मनपा हद्दीतील सर्व नागरिकांसाठी 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेकरिता स्वलिखित हस्ताक्षरामध्ये स्पर्धकांनी ७ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत आपले निबंध पालिकेच्या लोकनेते दि.बा. पाटील शाळेचे मुख्याध्यापक वाल्मिक राठोड यांच्याकडे सुपूर्त करावे, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

याच बरोबर 'मराठी भाषाचे सौंदर्य आणि नवी दिशा' या विषयावरती प्रा.डॉ.वि.ल.धारूरकर, छत्रपती संभाजीनगर यांच्या व्याख्यानाचे ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शासकीय अध्यापक महाविद्यालय व दुपारी ३ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजन करण्यात आले आहे तसेच विविध शाळांमध्ये प्रश्नमंजूषा, व्याख्यान, प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घेण्याचे व मराठी भाषेच्या संवर्धनाच्या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



## कामोठे स्मशानभूमीत चिमणी बसवून विद्युत व्यवस्था होणार

### अरुणकुमार भगत यांच्या मागणीला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसवून या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था करण्याची मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी पनवेल पालिका आयुक्त यांच्याकडे केली होती. त्यानुसार पालिका आयुक्तांनी या मागणीची दखल घेत कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसविण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

कामोठे प्रभागातील सेक्टर १५ येथे संपूर्ण कामोठे शहरा करता एकच स्मशानभूमी असून ही स्मशानभूमी दाट लोकवस्तीच्या मध्यवर्ती भागात आहे. त्यामुळे या ठिकाणी पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर धुराचा त्रास सभोवताली राहणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे या स्मशानभूमीमध्ये धुराची चिमणी बसवणे आवश्यक आहे. तसेच या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळेस मोठी समस्या निर्माण होते. त्यामुळे या ठिकाणी विद्युत व्यवस्था वाढवणे आवश्यक आहे. या मागणीचे पत्र माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी पालिका आयुक्त यांना दिले होते. या मागणीची दखल घेत आता पनवेल महापालिका कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसवून या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था उपलब्ध करून देणार आहेत.



**पनवेल : ओम साई कलावंत मित्र मंडळातर्फे पूरग्रस्तांसाठी २५ हजार रुपयांचा धनादेश उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आला. या वेळी मंडळाचे सल्लागार व माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, मंडळाचे अध्यक्ष हेमंत पुजारा, कार्याध्यक्ष नितीन चोरघे आदी उपस्थित होते.**

## प्रभाग १९मधील रस्ता डागडुजीबाबत कार्यवाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग १९ मधील रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावे, अशी मागणी माजी महिला व बालकल्याण समिती सभापती तथा माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल महापालिकेकडे पत्र दिले होते. यानुसार त्यांच्या मागणीची दखल घेत पालिकेने प्रभाग १९मधील रस्ता डागडुजीची कामे सुरू केल्याची माहिती दिली.

पनवेल महानगरपालिका हद्दीत विविध रस्त्यांची कामे झालेली असून काही रस्त्यांमध्ये खड्डे पडलेले आढळून आलेले आहेत. त्या दृष्टीने कंत्राटदारांना सदर खड्डे बुजविण्याबाबत कळविण्यात आले असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. सध्या पावसाचे प्रमाण जास्त असल्याने खड्डे बुजविण्यावावत तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्ती करण्यात येत आहे, परंतु पाऊस थांबल्यानंतर डांबरीकरण करून योग्य रितीने दुरुस्ती करण्यात येईल, असे पनवेल महापालिका कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय समितीच्या वतीने शनिवारी (दि.४) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव आदरणीय डॉ. एस. टी. गडदे यांनी उपस्थित



राहून महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्याविषयी विचार मांडले व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, निशा नायर मुख्याध्यापिका, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. समाधान बेहरे ग्रंथपाल यांनी केली तसेच दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला व त्यांच्या विचारांची आजच्या काळातील गरज यावर चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर समन्वयक ग्रंथालय समिती यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## लायन्स क्लबतर्फे रुग्णांना फळेवाटप

**उरण : बातमीदार**

लायन्स क्लब तर्फे सेवा सप्ताह आयोजित केला आहे. या सप्ताहचे औचित्य साधून लायन्स क्लब उरण गोल्डच्या वतीने इंदिरा गांधी शासकीय हॉस्पिटल उरण येथील रुग्णांना फळेवाटप करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. या वेळी लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या अध्यक्ष निरज काडीयन, एम.जे.एफ. लायन्स संदिप म्हात्रे, लायन्स ॲड.दतात्रेय नवाळे, लायन्स रेखा घरत, लायन्स राजेंद्र ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.






**मोहोपाडा : जोरदार पावसामुळे येथील मार्केटमध्ये पाणी साचले होते. त्यामुळे रविवारचा बाजार विस्कळीत झाला.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

## मुलांसाठी सामूहिक आयंबिल तप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात रविवारी युवाचार्य श्री महेन्द्रऋषिजी म.सा. यांच्या जन्मदिवसानिमित्त मुलांसाठी सामूहिक आयंबिल तपाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ आणि जैन त्रिशला बहू मंडळ यांच्या वतीने यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी



युवाचार्य महेन्द्रऋषिजी म.सा. यांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा दिल्या. आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, देवाच्या चरणी प्रार्थना करतो की युवाचार्य श्री महेन्द्रऋषिजी शंभर वर्षांचे आयुष्य पूर्ण करो आणि त्या शंभर वर्षांच्या आयुष्यात त्यांनी आम्हा सर्वांना आशीर्वाद द्यावा. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे आम्ही प्रत्येकाने आपल्या जीवनात समाजाच्या हितासाठी चालण्याचा निर्णय घेतला आहे. हे कार्य त्यांच्या हस्ते देव कायम करत राहो. या कार्यक्रमाला जैन समाजाचे अनेक सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तप हा जीवनाचा स्रोत असून तो जीवनात उजळतेची ज्योत प्रज्वलित करतो. तप केल्याने कर्मांचा नाश होतो आणि मोक्षमार्ग साधला जातो. या सामूहिक तपामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपस्थितांनी भावनिकरित्या व्यक्त केले की, तपस्या शरीराला निर्मळ करते तर मनाला पवित्र करते. चंदनाशिवायही तिची खुशबू आयुष्यभर मनात दरवळते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक राजू सोनी, नितीन मुनोत, अध्यक्ष राजेश बांठिया, संजय जैन, पवन सोनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय

# शेतकऱ्यांसाठी केंद्रही तत्पर

राज्यात पावसाने घातलेल्या धुमाकूळाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी मात्र पळाले आहे. विशेषतः मराठवाड्याला याचा सर्वात जास्त फटका बसला असून शेती, गुरे, घरे, संसार सारेकाही वाहून गेले. पावसाने मारले असले तरी महायुतीचे सरकार शेतकऱ्यांप्रति संवेदनशील आहे. स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांनी पूरग्रस्त भागाचा दौरा करून दिवाळीपूर्वी मदत देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. आता केंद्र सरकारनेही मदतीसाठी तत्परता दर्शविलीय.

**महाराष्ट्रात यंदा जूनपासून सुरू झालेल्या मान्सूनने काही काळ शेतकऱ्यांना दिलासा दिला होता, मात्र जुलैपासून त्याने वेग वाढवला, जो स्वाभाविकच होता, पण जिथे ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये पावसाचे प्रमाण सर्वसाधारपणे कमी होते तेव्हा मात्र वरुणराजाने रौद्ररूप धारण केले. संपूर्ण राज्यात विशेषतः मराठवाडा, खान्देश तसेच विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये पावसाने थैमान घातले. नद्या, नाले तुडुंब भरून पूर आले, धरणांतूनही पाणी सोडावे लागले आणि गावागावांत पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले. शेतकऱ्यांच्या पिकांचे तर मोठे नुकसान झाले, गुरेढोरे वाहून गेली, घरे उद्ध्वस्त झाली आणि शेतकऱ्याचा संसार अक्षरशः उघड्यावर आला. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, परभणी, धाराशिव, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे अनेक गावे पूरबाधित झाली आहेत. शेतकऱ्यांचे सोयाबीन, कपाशी, तूर यासारखे हंगामी पिकांचे नुकसान झाले असून काही भागात तर संपूर्ण शेतच वाहून गेले आहे. राज्य सरकारने या नैसर्गिक संकटाची दखल घेत तातडीने मदतकार्य सुरू केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच इतर मंत्र्यांनी विविध भागांची पाहणी करून नुकसानग्रस्तांसाठी आर्थिक मदतीच्या घोषणा केल्या. दुसरीकडे आपत्ती काळात बचावपथके, एनडीआरएफ, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने अनेक ठिकाणी लोकांचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचाही प्रतिसाद महत्त्वाचा ठरतो. महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आलेले केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी राज्य सरकारला प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश दिले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या पूरस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची ठरते. ग्रामपंचायत, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांनी लोकसहभागातून पुनर्वसनाचे कार्य हाती घ्यावे. नागरिकांनीही या आपत्तीच्या काळात मानवतेचे दर्शन घडवावे. अनेक स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटनांनी मदतीचा हात पुढे केला आहे. देवस्थानेदेखील पुढे सरसावली हे एक सकारात्मक पाऊल म्हटले पाहिजे. प्रत्येक वेळी संकट आले की, महाराष्ट्राचा सामान्य नागरिक सरकारपेक्षा आधी मदतीसाठी पुढे सरसावतो. हीच या भूमीची ताकद आहे. हवामान बदलामुळे पावसाचा पॅटर्न पूर्णतः बदलला आहे. काही ठिकाणी दीर्घकाळ दुष्काळ, तर काही ठिकाणी एका आठवड्यात प्रचंड पाऊस ही अस्थिरता आज ग्रामीण अर्थव्यवस्थेला हादरवून टाकत आहे. निसर्गापुढे मानवाचे काहीएक चालत नाही, पण मानवानेही एरवी निसर्गाचा आदर राखून त्याचे जतन, संवर्धन केले पाहिजे. विकास आवश्यकच आहे, पण तो करताना निसर्ग, पर्यावरणाचाही विचार केल्यास अशा नैसर्गिक आपत्तींना थोपवता येऊ शकते.**

# राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना




राज्य शासन महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देत विविध सामाजिक व आर्थिक योजनांची अंमलबजावणी करत आहे. याच पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाने आदिवासी महिलांच्या सशक्तीकरणासाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजना सुरू केली आहे.

राणी दुर्गावती नाव हे भारतीय इतिहासात शौर्य, पराक्रम व दूरदृष्टीच्या प्रशासनासाठी आदराने घेण्यात येते. राणी दुर्गावती या आदिवासी समाजातील गोंड वंशाच्या अत्यंत पराक्रमी राणी होत्या, मोगलांशी करण्यात आलेल्या संघर्षात स्त्रीशक्तीचे प्रतिक म्हणून आजही त्यांच्या कार्यासाठी त्यांना स्मरणात ठेवले जाते. त्यांच्या गौरवशाली इतिहासाला स्मरण करत आपल्या देशातील अनेक राज्यांनी त्यांच्या नावाने कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत.

'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेंतर्गत वैयक्तिक महिलांना व्यवसाय सुरु करण्यासाठी ५० हजार रुपयापर्यंतचे अनुदान दिले जाते. त्याचबरोबर सामूहिकरित्या व्यवसाय सुरु करण्यासाठी म्हणजेच, महिला बचत गट किंवा सामूहिक गटांना व्यवसाय सुरु करण्यासाठी ७.५ लाख पर्यंतचे अनुदान या योजनेद्वारे दिले जाते.

शासनाच्या विविध विभागांमार्फत समाजाच्या विकासासाठी वैयक्तिक तसेच सामूहिक लाभाच्या अनेक योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ आदिवासी समाजालाही दिला जातो. त्याचबरोबर, आदिवासी घटक कार्यक्रमाखाली आदिवासी विकास विभाग विविध योजना राबवितो. केंद्र, राज्य , जिल्हा पातळीवरील योजनांसाठी इतर प्रशासकीय विभागांना आदिवासी विकास विभागाकडून पूरक निधी वितरित केला जातो. केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना वैयक्तिक तसेच सामुहिक योजनांसाठी आर्थिक साहाय्य प्रदान केले जाते. उत्पन्न, उत्पन्न वाढीच्या योजना, साधनसंपत्ती विकासाच्या योजना, आदिवासी कल्याणाच्या योजना यासाठी सर्वसाधारण आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अर्थसहाय्य तर आदिम जमातीसाठी १०० टक्के अर्थसाहाय्य दिले जाते. शासकीय योजनांमधील अनुदानाव्यतिरिक्त लाभार्थी हिस्सा भरणे शक्य नसल्यामुळे अनेक आदिवासी महिला उत्पन्न वाढीच्या शासकीय योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. ही बाब लक्षात घेता, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत आदिम जमातीच्या तरतुदीच्या अधीन तयार केलेल्या 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेसाठी आदिवासी महिलांना आर्थिक साहाय्य देताना अनुदानाची रक्कम १०० टक्के ठेवण्यात येईल.

वैयक्तिक योजनेमध्ये कृषी आणि पशुपालन: शेळी-म्हैस वाटप, गाय-म्हैस खरेदी, कुक्कुटपालन साहित्य आणि कृषी पंप खरेदी, लहान व्यवसायाकरिता शिलाई मशीन, चहा स्टॉल, भाजीपाला स्टॉल, फुलांचा आणि गुच्छांचा स्टॉल, पत्रावळी बनवण्याचे यंत्र, मासेमारी साधनावर अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. महिला बचतगट म्हणून तुम्ही एकत्रितपणे व्यवसाय सुरू करू शकतात. यासाठी ७.५ लाख अनुदान देण्यात येते. मसाला कांडप यंत्र किंवा आटा चक्की,शुद्ध पेयजल युनिट,बेकरी उत्पादनासाठी साहित्य, दूध संकलन आणि दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्र हे सर्व व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे.

ही योजना इतर विभागांच्या अनेक योजनांसाठी लाभार्थी हिस्सा भरण्यास मदत करते. याची काही उदाहरणे

पिंक (गुलाबी) ई-रिक्षा योजना: या योजनेसाठी आवश्यक असलेला ४० हजार लाभार्थी हिस्सा या योजनेतून मिळेल.

शेळी/मेंढी गट वाटप योजना: लाभार्थी हिस्सा तसेच वाहतूक आणि ५०टक्के विमा खर्च ही ५० हजार च्या मर्यादेत दिला जाईल.

एकात्मिक कुक्कुट विकास योजना: यात तलंग गट किंवा १०० दिवसीय कुक्कुट पक्षांच्या गटासाठी लागणारा ५०टक्के लाभार्थी हिस्सा दिला जातो.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना: या योजनेत शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण, ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच, आणि सौर पंप यांसारख्या विविध कृषी कामांसाठीचा लाभार्थी हिस्सा ५० हजार च्या मर्यादेत उपलब्ध करून दिला जाईल.

मत्स्यव्यवसाय साधने : यात मासेमारी जाळी आणि बिगर-यांत्रिक नौका खरेदीसाठी आवश्यक लाभार्थी हिस्सा दिला जातो.

या व्यतिरिक्त, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत, स्थानिक गरजा आणि मागणीनुसार नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरू करण्यासाठी वैयक्तिक किंवा सामूहिक योजनांनाही मंजुरी दिली जाते.

**या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य आणि जिल्हा स्तरावर समित्या स्थापन**

राज्यस्तर समिती ही आदिवासी महिलांना सर्व शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त मिळण्याकरिता कायमस्वरुपी काम करणार आहे. वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये आदिवासी महिला लाभार्थ्यांची निवड होत आहे किंवा कसे हे सुनिश्चित करणे, योजनानिहाय निर्देशित केलेल्या महिला आरक्षणाच्या किमान मर्यादेत महिलांना लाभ मिळत आहेत किंवा कसे याबाबत आढावा घेणे व पाठपुरावा करणे. त्याहीपेक्षा जास्त लाभार्थी महिला असाव्यात यासाठी वेळोवेळी संबंधित यंत्रणांना सूचना देऊन सदर बाब सुनिश्चित करणे. ज्या आदिवासी महिलांकडे लाभ घेण्यासाठी अनुषंगिक कागदपत्रे नाहीत त्यांना कागदपत्रे काढून देण्यासाठी प्रकल्प कार्यालयासोबत पाठपुरावा करणे व मार्गदर्शनाची भूमिका बजावणे.

योजनांचे लाभ जास्तीत जास्त आदिवासी महिलांना मिळावेत यासाठी प्रचार व प्रसिद्धी होत आहे किंवा कसे याची खातरजमा दर बैठकीच्या वेळी करणे तसेच योजनेचा लाभ घेण्याबाबत आदिवासी महिलांना ज्या समस्या येतील त्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे. प्रकल्प कार्यालयांतर्गत ज्या योजनांचे अर्ज मागविण्यात येत आहेत त्यामध्ये प्रकरणपरत्वे महिलांना प्राध्यान्याने लाभ देण्यात येत आहे किंवा कसे याबाबत आढावा घेणे.

या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्तरावरील कर्तव्य व जबाबदाऱ्या या प्रकल्प कार्यालय स्तरावर सर्व शासकीय योजनांची माहिती आदिवासी महिलांना देण्यासाठी अस्तित्वातील माहिती कक्षामार्फत देण्यात येणार आहे.

या माहिती कक्षामार्फत आदिवासी विकास विभाग व इतर सर्व प्रशासकीय विभागांद्वारा राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी करणे तसेच योजनांचा लाभ घेण्याबाबत महिलांना मार्गदर्शन करणे, त्यांना योजनांचा लाभ घेतांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे व त्यासाठी आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करणे.

या योजनांमध्ये आदिवासी महिलांचे जास्तीत जास्त अर्ज उपलब्ध होतील याबाबत प्रयत्न करणे. प्रकल्पस्तरीय मंजूर योजनांमध्ये महिलांना लाभ देत असतांना विधवा, परित्यक्त्या, दिव्यांग, एकल महिलांना प्राधान्याने लाभ मिळेल याची खातरजमा करणे. ज्या आदिवासी महिलांकडे लाभ घेण्यासाठी अनुषंगिक कागदपत्रे नाहीत त्यांना कागदपत्रे मिळवून देण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत शिबिरे आयोजित करणे आणि जास्तीत जास्त महिलांना यामधून योजनांची माहिती मिळेल, तसेच आवश्यक कागदपत्रे महाराजस्व अभियानांतर्गत लवकरात लवकर मिळतील हे सुनिश्चित करणे.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनांचे आराखडे तयार करतांना शक्य तेथे महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यायोग्य योजना प्रस्तावित करण्यात येतील याची खात्री करणे. आदिवासी महिलांच्या अधिकाधिक स्वयंसहाय्यता बचत गटांची निर्मिती होण्यासाठी आवश्यक इतक्या महिलांचे एकत्रित बँक खाते उघडून त्याची व अनुषांगिक माहिती महिला आर्थिक विकास महामंडळाकडे देण्यास सहकार्य करणे, जेणे करून अशा महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना अनुज्ञेय योजनांचा लाभ मिळण्यास मदत होईल.

**-शैलजा पाटील,**
**विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअॅपमध्ये चॅट उघडताच होते ग्रीन स्क्रीन



तुम्ही जर व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन वापरत असाल तर तुम्हाला सावधान राहण्याची आवश्यकता आहे. अॅपच्या बीटा २.२४.२४.५ व्हर्जनमध्ये एक मोठा बग समोर आला आहे. या बगमुळे युजर्सच्या फोनची स्क्रीन पूर्णपणे ग्रीन म्हणजेच हिरव्या रंगाची होत आहे. ही समस्या विशेषतः हजारो Android युजर्सना येत आहे. iOS बीटा टेस्टर्सना सध्या अशा कोणत्याही समस्येचा सामना करावा लागत नाही.

व्हॉट्सअॅप वापरणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. त्यामुळे त्यामध्ये नेहमीच नवनवे फिचर येत असतात, मात्र सर्वच फिचर सक्सेक होतात असे नाही. काही अपडेटमुळे धोकाही निर्माण होऊ शकतो. अशावेळी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

युजर्स चॅट किंवा मेसेज उघडण्याचा प्रयत्न करताच, स्क्रीन अचानक ग्रीन होते. अॅप बंद होईपर्यंत संपूर्ण स्क्रीन ग्रीनच दिसते. हजारो युजर्सना या समस्येचा सामना करावा लागत आहे. या समस्येबद्दल, काही युजर्सनी ट्विटरवरदेखील पोस्ट केली आहे. व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जन योग्यरित्या काम करत नाही आणि व्हॉट्सअॅप वापरताना स्क्रीन पुन्हा पुन्हा ग्रीन होते. मात्र, या समस्येबाबत मेटाकडून अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

**'असा' सोडवा प्रॉब्लेम**

सध्या ही समस्या व्हॉट्सअॅपच्या स्टेबल व्हर्जनमध्ये नाही. ही समस्या सोडवायची असेल तर काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.

- व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जनवरून स्टेबल व्हर्जनवर स्विच करा. यामुळे तुमचं व्हॉट्सअॅप पूर्णपणे सुरक्षित होईल.
- शक्य असल्यास, व्हॉट्सअॅप वेब किंवा लॅपटॉप, टॅबलेट किंवा आयफोनसारख्या इतर सर्व उपकरणांवर वापर करा. याच्या मदतीने तुम्ही बग टाळू शकता
- व्हॉट्सअॅप अनइन्स्टॉल करून पुन्हा इन्स्टॉल करा, परंतु हे करण्याआधी Google Cloud वर तुमच्या मेसेजचा बॅकअप घ्यायला विसरू नका, जेणेकरून तुमचे चॅट्स सुरक्षित राहतील.
- मेटा समस्येचे निराकरण करेपर्यंत तुम्ही वाट पाहू शकता.

# गायक, संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी



**निमित्त**

डॉ. सलील कुलकर्णी हे नावाजलेले मराठी-भारतीय गायक, संगीतकार आणि लेखक आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय संगीत कलाकारांपैकी एक, सलील कुलकर्णी हे संगीतकार, गायक आणि लेखक आहेत. सलीलला लहानपणापासूनच संगीताची आवड होती, त्यांनी फक्त तीन वर्षांचा असताना ऑल इंडिया रेडिओ, पुणे वर मराठी गद्य 'जयोस्तुते' गायले होते

सलील यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९७२ साली पुण्यात झाला.सलील यांनी त्यांची सांगीतिक कारकीर्द वयाच्या तिसऱ्या वर्षी आकाशवाणी वरून केली. ते केवळ संगीतकार नाही तर उत्तम गायक आणि लेखकही आहेत. एका मुलाखतीत सलील यांनी सांगितले की, घरात सर्वच उत्तम वाचक असल्यामुळे वाचनाची सवय लावली आणि शाळेत गेल्यानंतर कविता आवडीचा विषय बनली आणि त्यातच मन रमु लागले.

त्यांनी संगीताचे शिक्षण पं. गंगाधरबुवा पिंपळखरे, जयमाला शिलेदार आणि प्रमोद मराठे यांच्याकडे घेतले. शिक्षणाने ते डॉक्टर असून संगीताची प्रचंड आवड असल्याने त्यांनी संगीतामध्ये बस्तान बसवले.


सलील कुलकर्णी यांनी त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात अनेक अल्बम आणि शोसाठी गायक म्हणून केली १९९६ साली सलील यांची ओळख अंजली यांच्या सोबत झाली. अजंली या अनुराधा मराठे यांच्या कन्या आहेत. बऱ्याच ठिकाणी सलील व अंजली यांनी एकत्र गायन केले. दोघांचाही दुवा संगीत असल्याने दोघांची मैत्री चांगलीच गुफली. दोघांच्याही आवडी, निवडी संगीतात नवे काही तरी करण्याची धडपड यामुळे नकळत दोघांची मने जुळली. सलील लग्नासाठी मुलीच्या शोधत होते. त्यावेळी अंजली व सलील यांनी आपण दोघे एकमेकांना अनुकुल असल्याचे वाटल्यामुळे दोघांनीही लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्न झाल्यावर काही दिवसांतच सलील यांनी डॉक्टरची भल्यामोठ्या पगाराची नोकरी सोडून पूर्णवेळ संगीतात काम करण्याचे ठरवले. १९९९ मध्ये 'आनंद पहाट' या मराठी चित्रपटातून त्यांनी पदार्पण केले. त्यांनी अनेक हिंदी आणि मराठी अल्बमना संगीत दिले आहे. तसेच हिंदी आणि मराठी चित्रपटांना संगीत त्यांनी संगीत दिले आहे. २००३ मध्ये संदीप खरे यांच्या बरोबर त्यांनी आयुष्यावर बोलू काही हा सांगीतिक कार्यक्रम सुरू केला त्याला अफाट प्रसिद्धी मिळाली. त्याचे ७०० च्या वर प्रयोग झाले झी मराठी ने नक्षत्रांचे देणे हा विविध संगीतकार आणि कवी यांच्या गीतांवरील कार्यक्रमाचे संगीत नियोजन त्यांनी केले.

नवीन पिढीचे संगीतकार अशी त्यांची ओळख असून त्यातही बालगीतांचे संगीतकार म्हणून त्यांना जास्त पसंती आहे. त्यांचा अग्गोबाई ढग्गोबाई (अल्बम) हे विशेष गाजले आहेत.

दूरचित्रवाणी वरील सा रे ग म प तसेच गौरव महाराष्ट्राचा मधील परीक्षक म्हणून त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळाली. क्रिकेट आणि स्वयंपाक घरातील खुसखुशीत उदाहरणे देऊन त्यांनी नवीन गायकांना मार्गदर्शन केले आहे. आयुष्यावर बोलू काही या कार्यक्रमापासून ते सारेगमपमधील परिक्षकापर्यंतचा सलील यांचा प्रवास पाहता ते आज लहानथोरांचे आवडते झाले आहेत.

साभार : इंटरनेट्

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पाठदुखी दूर करण्यासाठी 'हे' पदार्थ बंद करा!

दिवसभराच्या बैठ्या कामांनी अनेकदा पाठ अवघडते. लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर काम असल्याने बसून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. एकाच आसनात बराच वेळ बसल्याने पाठदुखी होते.तुम्हाला जर पाठदुखीची समस्या असेल, तर काही पदार्थांपासून तुम्ही दूर राहणे गरजेचे आहे. हे पदार्थ नेमके कोणते ते जाणून घेऊ...



फिटनेस व पोषण शास्त्रज्ञ आणि फूड दरझीचे सह-संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. ज्यांना पाठदुखीची समस्या आहे त्यांनी साखर, साखरयुक्त सिरप, मका आणि तेल याचा आहारात समावेश करू नये. नैसर्गिक वा प्रक्रिया न केलेला मका हा आरोग्यदायी असला तरी प्रक्रियेदरम्यान त्यातील पोषक तत्त्वे निघून जातात आणि त्याचा आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आहारात मक्याचा समावेश करीत असाल, तर तो प्रक्रिया केलेला नसावा. प्रक्रिया केलेला मका खाल्ल्यानं पाठीच्या खालच्या वेदना वाढू शकतात.

डॉ. सिद्धांत भार्गव यांच्या मते, प्रक्रिया केलेल्या मक्यामुळे इन्सुलिनच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते आणि त्यामुळे जळजळ आणि वजन वाढू शकते. जास्त वजनामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण पडतो आणि पाठीच्या खालच्या भागात दुखणे वाढते. तसेच यामुळे जळजळ बरे होण्याची प्रक्रिया मंद होऊ शकते आणि पाठीच्या खालच्या भागात दुखण्यासारखी परिस्थिती वाढू शकते.

मक्यामध्ये बी जीवनसत्त्व आणि खनिजे तसेच फायबर असते. मध्यम प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्यासाठी हे घटक चांगले असू शकतात. संपूर्ण मक्यामध्ये अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार दाहकविरोधी आहारामुळे पाठदुखी कमी होण्यास मदत होते. भरपूर फळे आणि भाज्या खाणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात.

स्वयंपाक करताना हळद किंवा आले घातल्याने शक्तिशाली दाहकविरोधी फायदेदेखील मिळू शकतात तसेच भरपूर पाणी प्यायल्याने आपले शरीर हायड्रेट राहते आणि त्यामुळे स्नायूंमधील कडकपणा कमी होऊन संपूर्ण आरोग्याला चालना मिळते, असे डॉ. भार्गव म्हणाले.

# माणगावच्या बामणोली येथे पुलाचे उद्घाटन; महिला बचत भवनही बांधणार

## खासदार सुनील तटकरे यांचे आश्वासन

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसने नेहमीच सर्वांगीण विकासावर भर देत सामाजिक बांधिलकी समजून काम केले आहे. या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकासाच्या दिंडीला जात – धर्म विसरून अनेक गावांनी भरभरून साथ देत उत्तम प्रतिसाद दिला आहे. या बामणोली गावातील पुलाने केवळ गावेच जोडली गेली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून बांधलेल्या पुलाने बामणोली ग्रामस्थांची मने जोडून खर्या अर्थाने दसरा सणाच्या निमित्ताने सिमोल्लंघन केले आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि केंद्रीय इंधन समितीचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी बामणोली गावातील पुलाचे उदघाटन सोहळ्यात केले.



या पुलाच्या उद्घाटनप्रसंगी खासदार सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व कोकण संघटक ॲड. राजीव साबळे, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुका अध्यक्ष काका नवगणे, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर, महिला तालुका अध्यक्ष संगीता बक्कम, कुणबी समाज नेते महादेव बक्कम, शहर अध्यक्ष सुनील पवार, माजी सरपंच राजू शिर्के, शादाब गैबी, ॲड. सुशील दसवते, नगरसेवक सचिन बोंबले, शशिकांत मोहिते, इरफान हाजिते ग्रामस्थ, महिला आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा पुल बांधून तयार झाल्याने बामणोली गावाबरोबरच अन्य गावे माणगाव शहराला आपोआप जोडली गेली आहेत. त्यामुळे माणगाव शहराला जवळच असलेल्या बामणोली हे गाव भविष्यात अधिक प्रगती करू शकणार आहे. दरवर्षी पावसाळ्यात या गावाचा गोद नदीला पूर आल्यानंतर संपर्क तुटत होता. आता पुलाची उंची वाढवून ३ कोटी ५० लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात आल्याने सर्व गैरसोयी दूर झाल्या आहेत. त्यामुळे येथील ग्रामस्थांना माणगाव येथे जाण्यासाठी सोयीस्कर होणार आहे असे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

या बामणोली गावातील ग्रामस्थांनी माझ्या राजकीय वाटचालीत नेहमीच साथ सोबत दिली आहे. अशीच साथ आगामी प्रत्येक निवडणुकीत मिळेल अशी आशा व्यक्त करतो. येथे असलेल्या बामणोली गावाबरोबरच अन्य गावांत विविध प्रकारची सामाजिक विकासकामे करून ही गावे प्रगतीच्या दिंडीत सामील करून घेतली आहेत. महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी माणगाव येथे ११ कोटी रुपये खर्चून महिला बचत भवन बांधण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी सुचविलेली सर्व विकास कामे पूर्ण करु

# चौल–आग्राव रस्त्याची डागडुजी करण्याची प्रवासी, वाहनचालकांकडून मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल–आग्राव रस्त्याची पुरती दयनीय दुरावस्था झाली आहे . रस्त्याला खड्डेच खड्डे व खड्डयांची तळी झाली, परिणामी प्रवासी व ग्रामस्थांना येथून जा–ये करतान नरक यातना भोगण्याची वेळ आली आहे. मात्र आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकपुर्व चौल–आग्राव रस्तावरून सोशल मिडियावर आरोप प्रत्यारोप स्थानिक विविध पक्षीय मंडळीचे राजकीय फड रंगले आहे.




अलिबाग तालुक्यातील चौल ग्रामपंचायत हद्दीतील चौल–आग्राव रस्ता गेले काही वर्षे रस्ताच्या दुरावस्थेने तालुक्यात चर्चेचा व लक्ष्यवेधी विषय ठरला आहे. अनेक गावांशी निगडीत असलेला चौल–आग्राव रस्ताला प्रामुख्याने येथील श्रध्दा व भक्तीचे स्थान असलेले शितळादेवी माता मंदिरात देवीच्या दर्शनासाठी तालुक्यासह जिल्हा, राज्यातून नेहमी भक्तमंडळी भाविकतेने येतात. परंतू रस्ताच्या दयनिय दुरावस्थेने दुचाकी, चारचाकी अशी लहान मोठी वाहने चालविणे तसेच प्रवासीवर्ग, ग्रामस्थांना या मार्गाने मार्गक्रमण करणे जिकरीचे बनले. रस्त्याला खड्डेच खड्डे व खड्डाची तळी झाली,रस्ताची पुरती दयनिय अवस्था झाली आहे.

चौल ग्रामपंचायतीत सध्या प्रशासकीय कारभार सुरू आहे, त्यापुर्वी चौल ग्रामपंचायतीत शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांचे नेतृत्वाखाली सत्ता होती. परंतू तेथे सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रविण राउत, शिवसेना शिंदे गट,व भाजप, असे विरोधी पक्षाशी आघाडी आहे. गेले आमदार व खासदार निवडणूकी विरोधी आघाडीने चौल मध्ये मोठे मताधिक्य मिळविले, त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व चौल ग्रामपंचायत निवडणूकीत दोन्ही कडून चौल मध्ये राजकीय वरचष्मा मिळविण्याचा खटाटोप व जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे चौल–आग्राव रस्त्याच्या दयनीय अवस्थेस ऐकमेकांवर सोशल मिडियाव्दारे आरोप प्रत्यारोप जोरदार सुरू आहेत.

# जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अखेर उघडले

**मुरुड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध ऐतीहासीक जंजिरा किल्ला आज पासून पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे.सुमारे ३५० वर्षांपूर्वी खोल समुद्रात बांधलेला हा किल्ला असून चहू बाजूने समुद्राने वेढलेला आहे.खोल समुद्रात किल्ला असताना सुद्धा येथे दोन गोड्या पाण्याची तलाव आहेत. संपूर्ण भारतात हा किल्ला प्रसिद्ध असून वर्षाला किमान सात लाख पर्यटक हा किल्ला पहाण्यासाठी येत असतात.विशेष करून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शालेय विद्यार्थ्यांच्या सहली सर्वाधिक येत असतात.आज पासून किल्ला सुरु करण्यात आला असला तरी पर्यटकांचा प्रतिसाद फार थोडा आढळून आला.जंजिरा किल्ल्याचा दरवाजा पुरातत्व विभागाचे बहुउद्देशीय कर्मचारी–प्रकाश घुगरे यांच्या शुभ हस्ते उघडण्यात आला.



आज मुरुड मध्ये पावसाळी वातावरण होते.तसेच अधून मधून पावसाच्या सरी बरसत होत्या. तरी सुद्धा हौशी पर्यटक हा किल्ला पहाण्यासाठी आले होते.जंजिरा किल्ला पहाण्यासाठी १३ शिडांच्या बोटी असून आज पासून बोट चालकांना स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे.आज पहिलाच दिवस असल्याने थोडासा अल्प प्रतिसाद मिळाला असला तरी हळू हळू येथे मोठी गर्दी वाढणार आहे.मे २५ तारखेस किल्ला बंद करण्यात आला होता.मागील चार महिने किल्ला बंद होता.जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुल्ला करण्यात आल्याने स्थानिक बोट चालक व पर्यटकांवर निर्भर असलेले छोटे –मोठे व्यवसाय धारक यांनी समाधान व्यक्त केले आहे.ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी जेट्टी,खोरा बंदर,दिघी बंदरावरुन पर्यटकांची ने आण केली जात असते.किल्लाची साफ सफाई पूर्ण झाली असल्याने आज पासून पर्यटकांनसाठी किल्ला खुला करण्यात आला आहे.किल्ला पाहण्यासाठी १५ वर्षाच्या आतील मुला– मुलींना शुल्क माफ असुन १६ वर्षा वरील एक व्यक्ती २५ रुपये आकारण्यात येणार आहे. तसेच ऑनलाईन क्यु आर कोड ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



# माणगावात रायझिंग कॉम्प्लेक्समध्ये नवरात्रोत्सव उत्साहात



**माणगाव :** माणगावात सालाबादप्रमाणे यावर्षीही रायझिंग कॉम्प्लेक्समध्ये सलग चौथ्यांदा नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रायझिंग कॉम्प्लेक्स परिसरात नवरात्रोत्सवानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलीं होती. सोमवार दि. २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना झाल्यावर नवरात्र उत्सवाला प्रारंभ झाला. रायझिंग कॉम्प्लेक्सच्या नवरात्रोत्सवात महिलांनी,पुरुषांनी,तरुण युवक – युवतींनी सलग दहा दिवस दांडिया रास खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

या नवरात्रोत्सवाला माणगाव पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा हर्षदा काळे,चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,सामाजिक कार्यकर्ते सुमित काळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेटी देऊन नवरात्रोत्सवाला शुभेच्छा दिल्या. स्पर्धेला भेट देणाऱ्या सर्व मान्यवरांचे तसेच स्पर्धकांचे रायझिंग कॉम्प्लेक्स परिवारातर्फे स्वागत करण्यात आले. या नवरात्रोत्सवात मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.


## उरण नगरपरिषद उरण

ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड – ४००७०२

Email ID : uranmunicipal@gmail.com दूरध्वनी क्रमांक : ०२२२७२२२३२०

जा.क्र.: उनप/आस्था. विभाग./२०२५–२६/१६४३ दिनांक : ०५/१०/२०२५

**नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूक –२०२५**

**जाहीर सूचना**

उरण नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणेसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:–

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार – बुधवार,<br>दिनांक– ०८/१०/२०२५<br>वेळ– सकाळी १०.०० वा.<br>स्थळ – नगरपरिषद कार्यालय उरण |
| २ | आरक्षण प्रसिद्ध करण्याचा दिनांक | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | गुरुवार, दिनांक ०९/१०/२०२५ ते मंगळवार, दिनांक १४/१०/२०२५<br>(दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

टीप: हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना आवश्यक असल्यास सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**ठिकाण : उरण**
**दिनांक : ०६/१०/२०२५**

**सही/–**
**(समीर जाधव)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

## PANVEL, MUNICIPAL CORPORATION

**E-TENDER NOTICE (Third Call)**

**VEHICLE DEPARTMENT**

Commissioner, Panvel Municipal Corporation. Panvel invites quotation tenders through E-tendering system from competent bidders for "Selection of supplier for supply of tyre and battery for vehicles owned by Panvel Municipal orporation for a period of three years in Panvel Municipal Corporation". The lank forms and the detailed information regarding tenders will be available the website www.mahatenders.gov.in from 06/10/2025 to 20/10/2025 up to 3.00 PM

outward No-PMC/Vehicle/28-24/Sr.No.04/343
date :06/10/2025

**Sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**
**Panvel**


# गजनफर हसन कलाब यांचा सेवापूर्ती समारंभ

**रोहा : प्रतिनिधी**

पीएम श्री नगरपरिषद उर्दू शाळा रोहा क्रमांक ४चे मुख्याध्यापक गजनफर हसन कलाब नुकतेच ३९ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून निवृत्त झाले. शाळेमध्ये त्यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रोहावरचा मोहल्ला मज्जित कमिटीचे अध्यक्ष अलीम मुमेरे, मा. नगरसेवक महंमदशेठ डबीर, अहमदशेठ दर्जी, फरहान खामकर, कादिर रोगे, उस्मानभाई रोहेकर, तय्यब अली मुमेरे, इम्तियाज नाडकर, मजहर सिद्दीक, सनाउल्ला दर्जी, प्रसिद्ध शायर सैफुल्ला फिरफिरे, शायर मंजर शरीफ, शाहीद कलाब सादीक खोत, गावडे गुरुजी, सुरेश मोरे, हाजी शौकत जळगावकर, किशोर तावडे, शैलेश रावकर, लियाकत राऊत, पूजा मांझी, मोहसीन पीरजादे, एजाज इनामदार, सईद चाऊस, वसीम सावरटकर, मोहम्मद तारीक, हनीफ मोमीन, दत्तात्रय शेडगे, ऐनोडकर उपस्थित होते.

शाळेच्या नवनियुक्त मुख्याध्यापिका मैमुना जळगावकर, इनायत कोंडविलकर, सबा कारानी, निलोफरअधिकारी, रियाज मोमीन, सना सिद्दीकी, नाझिया शेख, जुवेरिया चोगले, जाहेदा पठाण,हीनाखान,मासूमा पटेल, आशना सिद्दीक इत्यादी शिक्षकवृंदानी मेहनत घेतली. शिक्षकांनी त्यांच्या कामाचा गौरव करून भेट वस्तू प्रदान करून केला.




## ग्रामपंचायत विचुंबे ता. पनवेल, जि.रायगड

**निविदा सुचना** दि. : ०६/१०/२०२५

ग्रामपंचायत विचुंबे यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत विचुंबे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत विचुंबे येथे दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत विचुंबे यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत विचुंबे परीसरातील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.१३/१०/२०२५ | दि.१३/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून देवाला आहे.

**सही/–**
**श्री. गणेश गोविंद गायकर**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**श्री. प्रमोद शांताराम भिंगारकर**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## ग्रामपंचायत कोन ता. पनवेल, जि.रायगड

**निविदा सुचना** दि. : ०६/१०/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत कोन यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत कोन हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रुप ग्रामपंचायत कोन येथे दि.१३/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रुप ग्रामपंचायत कोन यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत कोन परीसरातील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.१३/१०/२०२५ | दि.१३/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून देवाला आहे.

**सही/–**
**श्री. रमेश नामदेव तारेकर**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कोन**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# गव्हाण फाटा वाहतूक पोलिसांनी केले वाहनचालकांचे प्रबोधन

**उरण : प्रतिनिधी**

उरण, पनवेल, नवी मुंबई, मुंबईसह पुणे व कोकण, गोवा अशा राज्यातील प्रमुख महामार्ग असलेल्या गव्हाण फाटा वाहतूक पोलिसांच्या वतीने वाहनचालकांना वाहतूक नियमांबाबत प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन गव्हाणफाटा वाहतूक शाखेचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन बडगुजर यांच्या अधिपत्त्याखाली त्यांच्या वाहतूक पोलीस कार्यालय आयोजित करण्यात आले होते.



या वेळी वाहनचालकांनी मद्यपान करून वाहन चालऊ नये, असे सुरुवातीचा सूचित करण्यात आले. याशिवाय अवजड कंटेनर ट्रेलर आणि कार्गो अशा वाहनचालकांसह सर्वच अवजड वाहन चालविणाऱ्या चालकांनी वाहन चालवीत असतांना मोबाईलचा वापर करू नये. वाहनचालकांनी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी वाहने थांबवू नये. त्याचप्रमाणे वाहनचालकांनी महामार्गावर संतुलित वेगाने वाहने चालवावीत, कोणीही भरधाव वेगाने आपली वाहने चालवून अपघातास कारणीभूत ठरू नये. याबाबत प्रबोधन केले.

महामार्गावर अपघात झाल्यास जखमींना तत्काळ हॉस्पिटलमध्ये पोहचविण्यासाठी १०० क्रमांक व ११२ क्रमांकाला फोन करून अपघाताची माहिती तात्काळ द्यावी. याशिवाय जवळच्या वाहतूक नियंत्रण कक्षाकडे व संबंधित पोलीस ठाण्यात कळवावे तसेच १०८, १०३३ क्रमांकावर फोन करून एब्युलन्स बोलवावी, याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन बडगुजर यांनी वाहन चालकांना प्रबोधनातून आवाहन केले. अशा प्रकारे विविध प्रबोधन कार्यक्रमांद्वारे वाहन चालक तसेच जड-अवजड वाहन चालक यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

# इस्कॉन कंपनीमधील चोरीचा गुन्हा उघडकीस

**रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मौजे कराडे गावाच्या हद्दीत असलेल्याअतिरिक्त एमआयडीसीत इस्कॉन कंपनीमध्ये २० मार्च २०२५ रोजी कंपनीच्या आवारात घुसून अज्ञात चोरट्यांनी ५३ हजार ५०० रुपये किमतीची वायर व पाईप चोरी केली होती. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात २० मार्च २०२५ रोजी ७०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५प्रमाणे या चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती.

चोरीला गेलेला माल व आरोपींना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली होती. जवळपास सहा ते सात महिने उलटून गेल्यानंतर या तपासाची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना गोपनीय बातमीदारांमार्फत खात्रीलायक माहिती प्राप्त झाल्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने चोरीतील विधी संघर्षित बालकांना ताब्यात घेतल्यावर त्यांनी इस्कॉन कंपनीत चोरी केली असल्याची कबुली त्यांच्या पालकांच्या समक्ष दिली.चोरी करणारे हे अल्पवयीन(विधी संघर्षित) बालक असून त्यांना ३ ऑक्टोबर २०२५ रोजी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी रसायनी पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

# फुंडे महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे येथे बौद्धिक संपदा हक्क व नवोन्मेष (IPR २०२५) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा संशोधन प्रवर्तन व नीतिशास्त्र समिती तसेच आयक्यूएसी (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.

प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या उद्घाटनावेळी त्यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे उद्योजकतेला मिळणारे पाठबळ, संशोधन व नवोन्मेष वृद्धीकरणातील त्यांचे महत्त्व तसेच स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत त्यांची भूमिका यावर प्रकाश टाकला. संसाधन व्यक्ती म्हणून डॉ. प्रमोद ठाकूर (एम. पी.ए.एस.सी. कॉलेज, पनवेल) व डॉ. शंकर कोंडा (के. जे. सोमैया कॉलेज, कोपरगाव) यांनी सहभागी विद्यार्थ्यांना व संशोधकांना पेटंट प्रक्रिया, कायदेशीर संरक्षणाची गरज व नवोन्मेषी कल्पनांचे व्यावसायिकीकरण याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. अनिल पालवे (समन्वयक), डॉ. गुरुमीत सी. वाधवा (सह-समन्वयक), डॉ. आर. बी. पाटील (संयोजक) व डॉ. एस. एम. तांदळे (सह-संयोजक) यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. प्रियांका ठाकूर व डॉ. श्रेया पाटील यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. एस. एम. तांदळे व डॉ. ए. एम. पालवे यांनी केले. आयोजन समिती सदस्यांमध्ये गजानन चव्हाण, अर्जुन पाटील, डॉ. झेलेम झेंडे, भूषण ठाकूर, दिक्षिता म्हात्रे, रश्मी पुरके यांचा समावेश होता. राज्यातील विविध महाविद्यालयांतून १३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला, ज्यामुळे ही कार्यशाळा अधिक परिणामकारक ठरली.

चर्चासत्रे, प्रश्नोत्तरे व मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक संपदा हक्कांविषयी जागरूकता निर्माण झाली५ आणि संशोधनासोबतच उद्योजकतेबाबत नव्या संधींचा वेध घेण्यास प्रोत्साहन मिळाले.

# कामोठे येथे जेएसएस रायगडतर्फे विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जन शिक्षण संस्थान (जे.एस.एस.) रायगडच्या माध्यमातून बुधवारी (दि.१) कामोठे येथे स्वच्छता श्रमदान व कापडी पिशव्यांचे वाटप तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वछतेची शपथही देण्यात आली.



कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार'' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आता पर्यंत ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून कामोठे-पनवेल ह्या ठिकाणी स्वच्छता श्रमदान व कापडी पिशव्यांचे वाटप या उपक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका स्नेहा राणे व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# सानपाड्यात ऑपरेशन गॉड अंतर्गत स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

महात्मा गांधी जयंती व दसरा या दोन्ही राष्ट्रीय व धार्मिक महत्त्वाच्या दिवसाचे औचित्य साधून सानपाडा विभागात स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांनी रस्त्यावर, झाडाखाली, उद्यानात टाकून दिलेल्या देवदेवतांच्या मूर्ती, प्रतिमा, धार्मिक ग्रंथ तसेच देशाचे झेंडे यांचे सन्मानपूर्वक संकलन करून त्यांचे विधिवत विसर्जन करण्यात आले. हे अभियान सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे, शिवतेज मित्र मंडळाचे माजी अध्यक्ष अनिल शिळकर व सानपाडा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना शाखाप्रमुख समाजसेवक सुरेश कदमयांच्या पुढाकाराने राबविण्यात आले.



गुरुवारी सकाळी दोन तास चाललेल्या या स्वच्छता मोहिमेत जवळपास एक क्विंटल प्रतिमा, फोटो व मूर्ती संकलित करण्यात आल्या. संकलित सामग्रीचे विसर्जन चिंचोली-जुईनगर तलाव व महानगरपालिकेच्या विसर्जन कलशात करण्यात आले. एकीकडे आपण देवतांना पुजतो, तर दुसरीकडे देवतांच्या मूर्ती फ्रेम जुन्या झाल्या की झाडाच्या आडोशाला टाकतो.

ही चुकीची पद्धत असून, त्यामुळे देवतांचा अपमान आपण करत असतो. त्यापेक्षा या मूर्ती किंवा साहित्य पालिकेच्या कर्मचाऱ्यांना द्यावे त्याआधी त्याची विधिवत उत्तर पूजा करावी अशा पद्धतीची जनजागृती या वेळी करण्यात आली.

**अशी आहे संकल्पना**

देव-देवतांच्या प्रतिमा, ग्रंथ, झेंडे रस्त्यावर फेकणे ही चुकीची पद्धत आहे याविषयी जनजागृती करण्यात आली. धार्मिक वस्तूंचे विधिवत विसर्जन करून समाजात आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. आपला प्रभाग - आपली जबाबदारी या संकल्पनेतून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. नागरिकांना स्वच्छता व धार्मिक सलोखा याचा संदेश देण्यात आला.

**देव-देवतांचे फोटो, मूर्ती, ग्रंथ किंवा देशाचे झेंडे रस्त्यावर फेकणे म्हणजे केवळ स्वच्छतेचा प्रश्न नाही तर श्रद्धा आणि संस्कृतीची विटंबना आहे. म्हणूनच गांधी जयंती आणि दसऱ्याच्या शुभदिनी आम्ही हा उपक्रम हाती घेतला. आमचा संदेश साधा आहे-आपले शहर, आपली जबाबदारी. प्रशासनाची वाट न पाहता नागरिकांनी पुढाकार घेतला तर आपले शहर नक्कीच देशपातळीवर आदर्श ठरेल.**

**-निलेश कचरे,** सामाजिक कार्यकर्ते

# संजय म्हात्रेंना कार्यक्षम गुरूकुल प्रमुख पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा समर्थ वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचा शैक्षणिक क्रांती घडवून आणणारा वटवृक्ष ४ ऑक्टोबर १९१९ रोजी लावला आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवून भागीरथी कार्य केले. या रयत शिक्षण संस्थेचा ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सातारा येथे '१०६ वा' वर्धापन दिन साजरा करण्यात आला.



संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात मिळून ७०० पेक्षा अधिक शैक्षणिक शाखा सुरू असलेल्या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. या उपक्रमा पैकी 'गुरुकुल' हा प्रकल्प राबवण्यात येतो. आज संस्थेच्या वर्धापन दिनी सातारा येथे, आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्रातील ग्रामीण कवी 'इंद्रजीत भालेराव', रायगडचे भाग्यविधाते संस्थेचे मॅनेजिंग कॉन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन या विद्यालयात गुरुकुल प्रमुख म्हणून कार्यरत असलेले शिक्षक संजय म्हात्रे यांना कार्यक्षम गुरुकुल प्रमुख या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# युईएस कॉलेजमध्ये वृक्षारोपण

**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विदयमाने युईएस स्कूल अॅण्ड ज्यु.कॉलेजमध्ये शुक्रवार (दि.३) वृक्षारोपण सोहळा साजरा करण्यात आला. कॉलेजच्या परिसरामध्ये फणस, बदाम, चिंच, जांभूळ व आंबा अश्या विविध प्रकारची झाडे लावण्यात आली.

वृक्षारोपणाच्या या कार्यक्रमासाठी यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष व लायन चंद्रकांत ठक्कर, सहसचिव अॅड. अपूर्वा ठाकूर, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्य, समन्वयक, लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष ओव्हळ, डिस्ट्रिकट चेअरमन सदानंद गायकवाड आणि संजीव अग्रवाल, सेक्रेटरी लायन ओव्हळ व इतर सदस्य तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व कर्मचारी या सर्वांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



# मुलीवर अत्याचार; तरुणास अटक

**पनवेल : वार्ताहर**

अंबरनाथमध्ये राहणाऱ्या एका तरुणाने अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची व त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहून प्रसूत झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर तळोजा पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

प्रेमसंबंधातूनच आरोपी तरुणाने गत फेब्रुवारी महिन्यामध्ये पीडित मुलीला फिरायला जाण्याच्या बहाण्याने तिला अंबरनाथ येथून मोटारसायकलने तळोजा येथील बहिणीच्या घरी नेले. त्यानंतर त्याने पीडित मुलीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली. पीडितेने ही माहिती आपल्या आई-वडिलांना सांगितली नाही. पीडितेच्या पोटात दुखू लागल्यावर ती गरोदर असल्याचे कुटुंबीयांना समजले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर पीडिता प्रसूत होऊन तिला मुलगी झाली.

कुटुंबीयांनी उल्हासनगर हिललाइन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी तरुणाविरोधात बलात्कारासह पॉक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी तळोजा पोलिसाकडे वर्ग केला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची सहल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेतर्फे माजी विद्यार्थ्यांसाठी शनिवारी (दि.४) इमॅजिका येथे एक दिवसीय सहलीचे आयोजन केले होते.

या एकदिवसीय सहलीचे मुख्य उद्दिष्ट माजी विद्यार्थ्यांमध्ये परस्पर स्नेह, संवाद व साखळी निर्माण करणे व त्यांच्या दैनंदिन तणावग्रस्त आयुष्यात थोडा विरंगुळा निर्माण करणे तसेच कॉलेज आणि माजी विद्यार्थी यांच्यातील संबंध अधिक दृढ करणे हे होते. हा उपक्रम माजी विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय, रोमांचकारी आणि आनंददायी अनुभव ठरला. या सहलीत सहभागी झालेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी कॉलेज व्यवस्थापनाचे तसेच शैक्षणिक वर्षापासून या उपक्रमाची सुरुवात करणाऱ्या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे विशेष आभार मानले.

या सहलीमुळे माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले तसेच त्यांना त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळाली. या उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल विद्यार्थ्यांनी प्रा. महेश धायगुडे आणि माजी विद्यार्थी संघटनेचे मन:पूर्वक आभार मानले. या सहलीत प्रा. रेहुमा खान व प्रा. राहुल कांबळे यांना माजी विद्यार्थ्यांना सोबत सहभागी होण्याची संधी मिळाली. माजी विद्यार्थ्यांनी भविष्यातदेखील महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या उपक्रमांकमांमध्ये उत्साहात सहभाग घेऊ, अशी ग्वाही दिली.



# गव्हाण विद्यालयात 'रयत'चा १०६वा वर्धापन दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचा १०६वा वर्धापन दिन संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९मध्ये स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचा डोलारा महाराष्ट्रभर मोठ्या दिमाखात उभा आहे. रयत शिक्षण संस्था ही श्रमसंस्काराचे आणि स्वावलंबनाचे धडे देणारी जगातील पहिली शिक्षण संस्था आणि श्रमदानातून शिक्षणाचा आधुनिक मंत्र देणारी आधुनिक शिक्षण संस्था म्हणूनही गौरविली जाते. संस्थेचा शतकोत्तर षष्ठम वर्षाचा वर्धापन दिन विद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळ सत्रातील समारंभात पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माउली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ मेंबर रविंद्र भोईर व लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी केले. या वेळी जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, राजेंद्र चौधरी, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, गुरूकुलप्रमुख संदीप भोईर, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर यांनी या वेळी केलेल्या भाषणात रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा मूलगामी विचार करून कर्मवीर अण्णांनी तळागाळातल्या समाजाला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी केलेले अथक प्रयत्न तसेच अण्णांना अभिप्रेत असणाऱ्या विद्यार्थ्यांची आज खरी गरज असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# रणरागिणी ग्रुपची सामाजिक बांधिलकी

**कळंबोली : बातमीदार**

नवरात्रीमध्ये समाजातील महिला वेगवेगळ्या रंगीत साड्या परिधान करत असतात. देवीची पूजा अर्चना करत असतात, पण समाजामध्ये कापड कष्ट म्हणून मजुरी करून आपले उदरनिर्वाह करणाऱ्या अश्या काही महिला आहेत ज्यांना आजदेखील स्वतःसाठी एक नवीन साडी घेणे किंवा रोज स्वतःसाठी तयार होणे शक्य होत नाही.



स्नेहल बागल यांच्या रणरागिणी ग्रुप मार्फत गोर गरीब महिलांसाठी साडी, फळे आणि लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. रणरागिणी ग्रूप मधील सर्व महिलांच्या सहकार्यातून एक छान असा कार्यक्रम आज पार पडला.

देवीची ओटी भरून जो आपल्याला आनंद मिळतो तोच आनंद ह्या रोजंदारीवर काम करून उदरनिर्वाह करणाऱ्या माय माऊलींच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाला. महिलांना स्वतःचा व्यवसाय वाढवावा त्यांनी देखील पुढे जावे ह्या संकल्पनेतून हा ग्रूप नेहमी कार्यरत आहे. या कार्यक्रमावेळी रणरागिणी ग्रुपमधील महिला उपस्थित होत्या.

# पेणमध्ये शेतीच्या नुकसानीचा आढावा

## खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील शेताच्या बांधावर



**पेण : प्रतिनिधी**

यावर्षी राज्यात सर्वत्र पडलेल्या मुसळधार पावसामुळे शेतीची अतोनात नुकसान झाले असून परतीच्या पावसाने सुद्धा शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री, आमदारांना शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत. जेणेकरून शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईंत कोणता अडथळा निर्माण होऊ नये. यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने खासदार धैर्यशिल पाटील व आमदार रविशेठ पाटील यांनी पेण तालुक्यातील वाशी, वडखळ विभागात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती नुकसानीची शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, गटविकास अधिकारी गजानन लेंडे, कृषी अधिकारी सागर वाडकर, भाजप दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाटील, माजी जि.प. सदस्य प्रभाकर (हरिओम) पाटील, माजी जि.प. सदस्य, डी.बी.पाटील, भाजपा पेण मंडल अध्यक्ष संजय डंगर, भाजप मा. तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील सर, वढाव सरपंच पूजा पाटील, मसद सरपंच हरिश्चंद्र पाटील, विवेक म्हात्रे, प्रफुल्ल म्हात्रे आदींसह तलाठी, ग्रामसेवक तसेच भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन शासन दरबारी मदत मिळवण्यासाठी पुढाकार घेतला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी भारतीय जनता पक्ष ठामपणे उभी आहे असे ते म्हणाले.

# परतीच्या जोरदार पावसामुळे भातपीक आडवे; शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाईची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

गेले अनेक दिवस परतीचा पाउस शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्यामुळे तालुक्यातील भात शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार होण्यांच्या मार्गावर असल्यामुळे त्यातच सायंकाळी पावसाची जोरदार बॅटींग आणी सोसाट्यांचा वारा यामुळे भात शेती पडत आहे, मात्र परतीचा पाऊस सायंकाळी येत असल्यामुळे हीच स्थिती सातत्याने राहिली तर हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळणार आशी भिती शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहेत.

सायंकाळी जोरदार पावसामुळे भात शेती पडत असून त्याचबरोबर शेतामध्ये पाणी जमा होत असल्यामुळे भात शेती कुजत चालली आहे. मागील आठवड्यापासून हस्त नक्षत्रांचा पाऊस शेतकरीवर्गास मारक ठरत आहे. दरवर्षी भात लागवड करायची आणी शेवटच्या क्षणांला भात शेतीचे प्रचंड नुकसान यामुळे मातीत टाकलेला पैसा धान्याच्या माध्यमातून मिळत नसल्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या अर्थिक संकटात सापडले आहे.

भात शेती कापण्यायोग्य होण्यांस काही दिवसांचा विलंब असून परतीच्या पावसाच्या भितीने फक्त भात शेतीचे होत असलेले नुकसान पाहण्याच्या पलीकडे दुसरा पर्याय नसल्यामुळे शेतकरी हवाळदिन झाला आहे. तालुक्यातील असलेली भात शेती अनेक ठिकाणी ओस पडत चालली आहे. यांचे कारण म्हणजे मातीत टाकलेला पैसा वसूल होत नाही.

शिवाय हातामध्ये हवे तेवढे धान्य मिळत नाही या तसेच परतीचा पाउस हे सर्व अस्मानी संकटाचा दरवर्षी शेतकरी वर्गास सामना करावा लागत असल्यामुळे भात शेती अल्प होत आहे, मात्र असे असले तरी सुद्धा तालुक्यात गेल्या काही वर्षात तुरळक स्वरूपात भात लागवड करण्यास वाढ झाली आहे, मात्र परतीच्या पावसाची दहशत आजही बळीराजास चिंताग्रस्त करून ठेवले आहे.

# पडवळ पिकाच्या उत्तम कृषी पद्धतीबाबत प्रशिक्षण

**रोहा : प्रतिनिधी**

सहकार व पणन विभाग, आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यीत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्त प्रकल्प (मॅग्नेट), महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळ पुणे व कृषी विभाग व आत्मा रायगड आणि कृषी विज्ञान केंद्र रोहा रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने पडवळ–उत्तम कृषी पद्धतीबाबत प्रशिक्षण कार्यक्रम मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता, ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा (जि. रायगड) येथे आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना पडवळ पिकाच्या उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत पद्धती, कीड–रोग नियंत्रण आणि विपणन याविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन देणे हा आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा आत्मा रायगड प्रकल्प संचालक श्रीमती वंदना शिंदे, रत्नागिरी झखण मॅग्नेट विभागीय प्रकल्प उपसंचालक मिलिंद जोशी, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषी विद्यान केंद्र रोहा डॉ. मनोज तलाठी, रोहा तालुका कृषी अधिकारी महादेव करे आधी उपस्थित राहणार आहेत.

प्रशिक्षणातील प्रमुख विषयामध्ये मॅग्नेट प्रकल्पाची ओळख, पडवळ उत्तम उत्पादन पद्धती व काळजी, पडवळ काढणीनंतरचे व्यवस्थापन, पडवळ पीक कीड व रोग नियंत्रण, पडवळ मार्केटिंग तंत्रज्ञान, लिंग समानता व सामाजिक समावेशन (GESI) या विषयांचा समावेश आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला मिलिंद जोशी, डॉ. राजेश मांजरेकर, डॉ. मनोज तलाठी, जीवन आरेकर, रमेश चौगुले, आणि प्रीती जोशी हे या प्रशिक्षणात मार्गदर्शन करणार आहेत.

हा कार्यक्रम प्रगतशील शेतकरी, कृषी विद्यार्थी, महिला बचत गट सदस्य तसेच शेतकरी वर्गातील सर्वांसाठी खुला असून सहभाग विनामूल्य आहे. प्रशिक्षण अधिक माहितीसाठी एमसीडीसी पुणे मनुष्यबळ विकास वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# अडीच वर्षाच्या बाळाचा मृत्यू

**कर्जत :** नेरळजवळील धामोते गावातील अडीच वर्षीय बाळाचा कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने मृत्यू झाला. कार्तिक अमोल विरले या बाळाला अल्प वयात कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने ग्रासले होते आणि आठ महिन्यांच्या प्रदीर्घ उपचारानंतर या बालकाचा मृत्यू झाला.



धामोते गावाचे रहिवाशी असलेले आणि नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांचे नातू आणि अमोल राजेंद्र विरले यांचे सुपुत्र कार्तिक याला जानेवारी महिन्यात ताप आला होता. हा ताप तब्बल महिनाभर निघाला नाही आणि नंतर सुरू झाले आणि निदान कॅन्सर असे झाले होते. मागील दोन महिने या बालकावर नवी मुंबई खारघर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयात उपचार सुरू होते. अनेक महिने उपचार करूनदेखील कार्तिक विरले यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही आणि अखेर त्याचा मृत्यू झाला.

# माथेरान भाजप पदाधिकाऱ्यांनी वेधले रेल्वे समस्यांकडे लक्ष




**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी माथेरान येथे आलेल्या रेल्वे अधिकारी वर्गासोबत भेट घेऊन माथेरानरेल्वे स्थानकातील समस्या कथन केल्या. या वेळी माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, संदीप कदम, उद्योजक शैलेश चाफेकर उपस्थित होते.

माथेरान रेल्वे स्थानकात कर्जत विभागीय अधिकारी वर्ग दि.५ रोजी आले होते. माथेरान भाजपच्या पदाधिकारी यांनी त्यांची प्रत्येक्ष भेट घेऊन येथील समस्यांचे कथन केले. अधिकारी वर्गासोबत चर्चा करून अनेक बाबी त्यांच्या निदर्शनास आणल्या. माथेरान रेल्वे स्थानकात अनेक समस्या असून त्यांचे निराकरण होणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळात रेल्वे स्थानकात असलेले खाद्यगृह पुन्हा सुरू करण्याबाबत अधिकारी वर्गाला सांगण्यात आले. पॉड हाऊस जेथे उभारणार आहात त्याठिकाणी पडलेला सगळा कचरा जुने पत्रे, लाकडे काढून परिसर स्वच्छ करावा.

नेरळ–माथेरान गाडी लवकरात लवकर सुरू करावी. फलाट क्रमांक दोन वर पर्यटकांना बसण्यासाठी सोयीसुविधा करण्यात यावी. तसेच माजी नगरसेवक संदीप कदम यांनी रेल्वे स्थानकातील आजूबाजूच्या परिसरामध्ये कचरा टाकला जात असून काही भागाला डम्पिंग ग्राउंडचे स्वरूप येत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने येथे कंपाऊंड करून जाळी बसविण्यात यावी असे नमूद केले.

यासर्व समस्यांबाबत आम्ही रेल्वे प्रशासनाला निवेदन दिलेले आहे. उपस्थित सर्व अधिकारी वर्गाने याबाबत सकारात्मकता दाखवली असून टप्या टप्याने सर्व समस्या सोडविण्याची ग्वाही दिली.

# फौजदारी कायदे विषयावर व्याख्यान

**पेण : प्रतिनिधी**

नामदेव सुर्वे लॉ कॉलेज येथे फौजदारी कायदे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी ॲड. संकल्प गायकवाड यांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमास कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवींद्र राठोड व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



ॲड. संकल्प गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सत्य तीन प्रकारचे असतात आरोपीचं सत्य, फिर्यादीचे सत्य आणि खरं सत्य. यात खरं सत्य शोधाण्याचे काम तपास यंत्रणाचे असते, त्यांनी त्यांचे काम योग्य प्रकारे केले तर एकही आरोपी सुटणार नाही, असे ते म्हणाले. तसेच जामीन (बेल) चा अधिकार प्रत्येक आरोपीला आहे, जेल हा अपवाद आहे असेही ते म्हणाले तसेच त्यांनी कायद्याविषयी इतरही मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजच्या प्राध्यपिका ॲड. कविता ढाकवळ व विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली.

# गणेश सजावट स्पर्धेत दर्शन मसणे, रामचंद्र कुडपाने प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत व खालापूर तालुक्यातील गणेश भक्तांसाठी गणेशोत्सवात सुधाकर घारे फाउंडेशनच्या वतीने गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कर्जत तालुक्यात शेलू येथील दर्शन मसणे तर खालापूर तालुक्यात वरची खोपोली येथील रामचंद्र कुडपाने यांनी प्रथम क्रमांक पटकवला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जन संपर्क कार्यालयातील सभागृहात गणेशोत्सव स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, उपाध्यक्ष एकनाथ धुळे, शहराध्यक्ष भगवान भोईर, माजी सभापती नारायण डामसे, नरेश जोशी, सुरेखा खेडकर, माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, भारती पालकर, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर, भानुदास मिसाळ, मंगल ऐनकर, प्रमोद माळी, भानुदास पालकर, युक्ता भोपतराव, हरेश घुडे, सागर जिशी, सुचित जाधव, लोहकरे, अतुल कडू, विलास जाधव आदी उपस्थित होते.

प्रथम क्रमांका साठी सन्मानपत्र व २५ हजार रुपये रोख, द्रितीय क्रमांकसाठी सन्मानपत्र व २० हजार रुपये रोख, तृतीय क्रमांकासाठी सन्मानपत्र व १५ हजार रुपये, चतुर्थ क्रमांकासाठी सन्मानपत्र व १० हजार रुपये रोख रक्कम देण्यात आली. तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन सहभागी स्पर्धकांनाही सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**स्पर्धेचा निकाल**

कर्जत तालुका प्रथम दर्शन मसणे (शेलू), द्वितीय प्रभाकर दाभणे (कोंदिवडे), तृतीय भूषण लदगे (वडवली), चतुर्थ शिवम पवार (कर्जत). खालापूर तालुका प्रथम रामचंद्र कुडपाने (वरची खोपोली), द्वितीय कौशल पवार (सावरोली), तृतीय सोहम यादव (खोपोली), सौरभ बारसकर (खालापूर)

# माथेरान भाजपच्या रणरागिणींचा सन्मान





**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान भारतीय जनता पार्टीच्या जेष्ठ महिला कार्यकर्त्या सुहासिनी शिंदे आणि तालुका स्तरीय कार्यकर्त्या प्रतिभा घावरे यांना आम्ही सावित्रीच्या लेकी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या बद्दल संपूर्ण माथेरान मधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या देशाला लाभलेल्या थोर स्त्रियांपैकी एक असून त्या महिला सक्षमीकरणाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत.त्या पहिल्या शिक्षिका समाज सुधारक आणि कवयित्री होत्या. त्यांनी भारतातील महिलांच्या हक्काच्या उन्नतीसाठी महत्वाची भूमिका बजावली आणि महिलांच्या समाजातील स्थानाच्या उन्नतीसाठी अखंड प्रेयन्त केले. अश्या सावित्रीच्या लेकी आज देखील समाजात असून समाजभिमुख कामे करीत आहेत.त्यांना अधिकाधिक ऊर्जा मिळून सामाजिक कामात बळ मिळावे यासाठीआम्ही सावित्रीच्या लेकी या सन्मानाने गौरविण्यात येते. हा सन्मान माथेरान मधील भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या

सुहासिनी शिंदे त्याच प्रमाणे माजी नगरसेविका तथा भाजपा तालुका स्तरीय कार्यकर्त्या प्रतिभा घावरे यांना शनिवार दि.४ सप्टेंबर रोजी अलिबाग येथील पीएनपी सभागृहात राज्याच्या महिला बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या दोन्ही कर्तृत्ववान महिलांचे, सत्कार मूर्तींचे याबद्दल संपूर्ण माथेरान मधून कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# कोर्लई गावात कणशीचा सण साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई गावात ख्रिश्चन समाजाची वस्ती आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या समाजातील लोक शेतामधून विविध पीक घेत असतात. रताळी, कलिंगड, चिबुड, काकडी, त्याचबरोबर विविध पालेभाज्या व पारंपरिक शेती करून आपला उदरनिर्वाह करीत असतात. सध्या पावसाळ्याचे दिवस संपले असून जून महिन्यात केलेली भाताची लागवड आता परिपूर्ण झाली असून भात पीक तयार झाले असून शेतामध्ये भाताच्या लोम्ब्या तयार झाल्या असून पीक चांगले बहरले आहे. तयार झालेले पीक हे देवाला अर्पण करून देवाचे आभार मानण्यासाठी कणशीचा सण कोर्लई गावात मोठ्या उत्सहात साजरा केला जातो.

कोर्लई गावामधील ख्रिस्ती लोक ४ ऑक्टोबर हा दिवस कणशीचा सण म्हणजेच शेतामध्ये पिकलेले पहिले अन्न देवाला अर्पण करत असतात. निसर्गाच्या व देवाच्या अगाध कुपेने शेतामध्ये मोठ्या प्रमाणात भात पीक तयार होत असते. शेतामध्ये तयार झालेले पीक देवाच्या आशीर्वादामुळे समस्त लोकांच्या पोटापाण्याची व्यवस्था होत असते.

देवाने दिलेले हे पीक देवाला समर्पित करण्याची प्रथा कोर्लई गावात असून या कार्यक्रमासाठी असंख्य महिला भाताच्या लोम्बी घेऊन शेतामध्ये जाऊन विशेष पार्थना करून देवाचे ऋण व्यक्त करून पिकलेले अन्न देवाला समर्पित करून अशीच कृपा अबाधित ठेऊन शेतामध्ये चांगले पीक येत राहो अशी पार्थना करीत असतात. देवाने दिलेल्या आशीर्वादाबद्दल ते उपकाराचे स्मरण सुद्धा करीत असतात.

आज सकाळी सर्व भाविक ग्रामस्थ बैलगाड्या सजवून शेतावर गेली. शेतावरील प्रार्थना झाल्यावर शेतामध्ये तयार झालेल्या भाताच्या लोम्ब्या घेऊन बैलगाडी सह माऊंट कार्मेल चर्च जवळ जमा झाले. शेतामधील पहिले अन्न चर्च मध्ये आणून चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली. चर्चमध्ये भारतातील सर्व शेतकऱ्यांसाठी प्रार्थना करण्यात आली. भारत हा देश कृषिप्रधान असून कष्ठ करणाऱ्या शेतकरी वर्गाचे कौतुक सुद्धा करण्यात आले. शेतकऱ्याला शेतीच्या कामात मदत करणारा बैल हासुद्धा महत्वाचा घटक असून त्याच्या दीर्घायुष्यासाठीसुद्धा पार्थना करण्यात आली. अश्याप्रकारे कोर्लई गावात कणशीचा सण मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. या सणांमध्ये सर्वजण सहभागी झाले होते.



# नागोठणे लायन्स क्लबतर्फे पर्यावरण रॅलीतून देशसेवेचा संदेश



**नागोठणे : बातमीदार**

लायन्स सेवा सप्ताह अंतर्गत शुक्रवारी (दि. ३) नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस. डी. परामर इंग्लिश मेडीयम स्कुलच्या सहकार्याने नागोठणे लायन्स क्लब आयोजित पर्यावरण रॅलीत देश सेवेचा संदेश देऊन लायन्स क्लबच्या सदस्यांनी नागोठण्यातच नव्हे संपूर्ण रायगड जिल्ह्यात आदर्श निर्माण करून दिला असून लायन्स क्लबच्या या कार्याचा नागोठणे परिसरातील नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

या पर्यावरण रॅलीत लायन्स क्लब अध्यक्ष सखाराम ताडकर, विवेक सुभेकर, प्रकाश जैन, दौलत मोदी, डॉ.अनिल गिते, विलास चौलकर, जयराम पवार, विवेक करडे, दिपक लोणारी, विद्या म्हात्रे, नागोठणे पोलीस स्टेशनशे गोपनीय विभागाचे प्रमुख पो. कॉ. स्वप्नील भालेराव, पो. कॉ. विक्रांत बांधणकर, परमार स्कुलच्या शिक्षिका स्नेहा काटकर, स्मिता पाटील यांच्यासह ४१ विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

पर्यावरण रॅलीची सुरुवात गवळआळी तील श्री राधाकृष्ण साईबाबा मंदिरा पासून करण्यात आली. ही रॅली गांधी चौक, श्री जोगेश्वरी माता मंदिर, पोलीस स्टेशन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, खुमाचा नाकामार्गे पुन्हा गांधी चौक कडून राधाकृष्ण साईबाबा मंदिर पर्यंत रॅली आल्यानंतर रॅलीची सांगता करण्यात आली.

ही रॅली भारत माते की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान अशा घोषणांनी दानाणून गेली होती. रॅली सोबत रिक्षातुन देश भक्तीपर गिते लावण्यात आली होती त्यामुळे परिसरात देशभक्तीमय स्वरूप निर्माण झाले होते.

झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरणाची रक्षा जगाची सुरक्षा, वाचाल तर वाचाल, भ्रष्टाचाराची सकाळी तोडा भ्रष्टाचारमुक्त भारत बनवा, पाणी आडवा पाणी जिरवा, पाणी वाचवा, पोलीस यंत्रणेला सहकार्य करा, शांतता एकोपा टिकवा, शिक्षणाकडे वळा, अंधश्रद्धमुक्त भारत बनवा, वाहतूक नियमांचे पालन करा, प्लास्टिकचा वापर टाळा, सुख समृद्धीचा झरा शिक्षण हाच मार्ग खरा अशा प्रकारे संदेश फलक या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी हातात घेऊन जनजागृती केली.

# खारघरमध्ये शी रन २०२५ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर सेंट्रल पार्क येथे रविवारी (दि. ५) महिला सबलीकरण आणि कॅन्सर जागृतीसाठी आयोजित करण्यात आलेली शी रन २०२५ ही धावण्याची स्पर्धा उत्साहात झाली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

पीसीसी कॅन्सर केअर अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर तसेच सोशल आर्किटेक्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. सकाळी ५ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेत महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांच्या आरोग्यविषयक जाणीवा वाढविणे आणि समाजात समानतेचा संदेश पोहचविणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## महिला सबलीकरण आणि कॅन्सर जागृतीसाठी स्पर्धा




भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पीसीसी कॅन्सर केअर अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरचे डॉ. पुष्कर चिरमाडे, डॉ. अमित चक्रवर्ती, डॉ. जयेश गोरी, डॉ. डोनाल्ड बाबू, डॉ. विकास गुप्ता, डॉ. नीता नायर, डॉ. योगेश बनसोडे, डॉ. निखिल राणे यांच्यासह विविध मान्यवरांनी उपस्थित राहून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. विजेत्यांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे देण्यात आली. आयोजकांच्या वतीने सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून उपक्रमाचे कौतुक

*या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महिलांच्या सहभागाचे कौतुक करताना सांगितले की, महिला सक्षम झाल्या तर समाज अधिक सक्षम होतो. आपण सगळे आपल्या आयुष्यात कुटुंबासोबतचा दीर्घ सहवास इच्छितो, परंतु आज ज्या परिस्थितीत आपण जगत आहोत, त्यामध्ये आपण जे अन्न खातो, जशी जीवनशैली जगतो त्यात अनेकदा आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते आणि नकळत आपण कर्करोगाला आमंत्रण देतो. आपल्याला जर आपल्या कुटुंबासोबत दीर्घायुष्य जगायचे असेल, तर कर्करोगाबाबत जागरूकता असणे तितकेच आवश्यक आहे आणि अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.*

# ‘सीकेटी’चा अवधूत नाईक स्केटिंग स्पर्धेत प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथे झालेल्या स्केटिंग स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील अवधूत सागर नाईक (इ. बारावी) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्केटिंग स्पर्धेतील अवधूतच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन




माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कुस्ती स्पर्धेत कर्जतची समृद्धी लोभी विजेती



**कर्जत : प्रतिनिधी**

पोलीस मुख्यालय, रोडपाली कळंबोली येथे आयोजित विभागीय कुस्ती स्पर्धेत कर्जत तालुक्यातील बीड येथील समृद्धी शिवाजी लोभी हिने ७९ किलो वजनी गटात विजेतेपद पटकाविले आहे. रायगड जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय आणि नवी पोलीस मुख्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अनेक शाळांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. बीड शाळेतील विद्यार्थिनी समृद्धीने मिळवलेल्या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

# रायगडच्या आर्यन देशमुखची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाचा कर्णधार व खारघरच्या चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी संघाचा धडाकेबाज डावखुरा फलंदाज आर्यन जितेंद्र देशमुख याची महाराष्ट्राच्या १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) आपला १९ वर्षाखालील मुलांचा अंतिम पंधरा खेळाडूंचा संघ जाहीर केला. त्यात रायगडच्या आर्यन देशमुख याचा समावेश करण्यात आला आहे. निवडलेला संघ बीसीसीआयच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कुचबिहार एकदिवसीय क्रिकेट



स्पर्धेत सहभागी होणार असून रांची येथे रवाना होईल.

रायगडच्या आर्यन देशमुख याच्याशी संवाद साधला असता त्याने आपल्या निवडीबाबत अत्यंत आनंद झाल्याचे सांगितले. या यशात पालकांचा मोठा वाटा असल्याचे त्याने म्हटले. वडील जितेंद्र देशमुख हे स्वतः आपल्याला प्रशिक्षण देत आहेत तसेच चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आकाश पटारिया, सुनील सरगर व रोशन अडे यांनीसुद्धा वेळोवेळी चांगले व्यासपीठ व प्रशिक्षण दिले असल्याचे त्याने सांगितले.

गतवर्षी आरडीसीएच्या वतीने विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले असल्याने जिल्ह्यातील होतकरू, गुणवान खेळाडूंना स्पर्धा, सामने खेळण्याची संधी उपलब्ध झाली. खेळाडूंना त्याचा मोठा फायदा झाला असल्याचे आर्यनने माध्यमांशी बोलताना सांगितले. आर्यन हा रायगडच्या १९ वर्षाखालील मुलांच्या संघाचा कर्णधार असून त्याची निवड रायगडच्या वरिष्ठ गटाच्या संघातसुद्धा गतवर्षी करण्यात आली होती. एमसीएच्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत आर्यनने उत्तम कामगिरी केली होती. त्यानंतर त्याचा समावेश निवड चाचणी शिबिरासाठी करण्यात आला. निवड चाचणीतील सामन्यात आर्यनने ४००पेक्षा जास्ती धावा काढून सर्वांचे लक्ष वेधले होते.

आर्यन देशमुखची निवड झाल्याने आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांनी आनंद व्यक्त केला असून महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात रायगड जिल्ह्यातील खेळाडूंची निवड होत असल्याने इतर खेळाडूंनासुद्धा यातून प्रेरणा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. आरडीसीएचे सर्व पदाधिकारी, सदस्यांनी आर्यनला शुभेच्छा दिल्या आहेत.

### जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये गुणवत्ता

रायगड जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये गुणवता आहे. फक्त त्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रोत्साहन व क्रिकेट खेळण्यासाठी व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने येणाऱ्या क्रिकेट हंगामासाठी विविध वयोगटातील मुला-मुलींसाठी जास्तीत जास्त स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे व टॅलेंट हंटसारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी बोलताना सांगितले.

# जागतिक पॅरा अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत निषाद आणि सिमरनला सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

निषाद कुमार आणि सिमरन शर्मा यांनी जागतिक पॅरा अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत अनुक्रमे उंच उडी आणि १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकावले. भारताने एकाच दिवशी चार पदकांची कमाई करताना पदकतालिकेत चौथ्या स्थानावर झेप घेतली.

भारताला अन्य दोन पदके प्रीती पाल (२०० मीटर) आणि प्रदीप कुमार (थाळी फेक) यांनी मिळवून दिली. दोघेही कांस्यपदकाचे मानकरी ठरले. भारताची आता सहा सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्यपदके झाली आहेत. स्पर्धेचे दोन दिवस शिल्लक असून भारताला सर्वोत्तम कामगिरीची अपेक्षा आहे. यापूर्वी २०२४मधील स्पर्धेत भारताने एकूण १७ पदके मिळवली होती. ब्राझील, चीन, जपान पहिल्या





तीन क्रमांकावर कायम आहेत.

महिलांच्या ‘टी १२’ विभागात सिमरन हिने १०० मीटर धावण्याची शर्यत जिंकताना ११.९५ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ दिली. गेल्या वर्षी सिमरन २०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक विजेती होती. पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत ती कांस्यपदकाची मानकरी ठरली होती. चीनची लियांग यानफेन रौप्य, तर स्पेनची नागोर फोलगाडो कांस्यपदकाची मानकरी ठरली.

निषादने आपल्या २६व्या वाढदिवशी पुरुषांच्या ‘टी ४७’ विभागात उंच उडीत सोनेरी यश मिळविले. त्याने २.१४ मीटरच्या आशियाई विक्रमासह हे यश संपादन केले. त्याने टोकियो आणि पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये प्रत्येकी एक रौप्य, २०१९च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत एक कांस्य आणि २०२३च्या आवृत्तीत एक रौप्यपदक मिळविले होते.

# ऑस्ट्रेलियाने टी-२० मालिका जिंकली

## न्यूझीलंडवर विजय; मिचेल मार्शचे शतक

**माऊंट मौंगानुई : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श याने आपले पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय शतक झळकावले. त्याच्या या शतकी खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडवर तीन गडी राखून विजय मिळवत चॅपेल-हॅडली मालिका २-० अशी जिंकली.

मधल्या षटकांमध्ये संघाने एकापाठोपाठ विकेट गमावल्यानंतरही मार्शने संघाला विजय मिळवून दिला. न्यूझीलंडने दिलेले १५७ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने दोन षटके बाकी असताना सात गड्यांच्या मोबदल्यात १६० धावा करून पूर्ण केले. मार्श १०३ धावांवर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाच्या एकूण धावसंख्येपैकी ६० टक्क्यांहून



अधिक धावा त्याने एकट्याने केल्या. बुधवारच्या पहिल्या सामन्यातही मार्शने ४३ चेंडूंत ८५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती.

याआधी शुक्रवारचा दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला होता. दरम्यान, या तिसऱ्या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा संघ ५० षटकांत नऊ बाद १५६ धावसंख्येपर्यंत मजल मारू शकला. सलामीवीर टिम सायफर्टने सर्वाधिक ३५ चेंडूंत ४८ धावा केल्या.

# भारतीय वंशाच्या हरजस सिंगचा विक्रम

## ग्रेड लेव्हल क्रिकेटमध्ये ३५ षटकारांसह त्रिशतकी खेळी

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारतीय वंशाचा खेळाडू आणि ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघातील माजी खेळाडू हरजस सिंगने सिडनीत खेळताना विक्रमांचा पाऊस पाडला आहे. हरजसने वेस्टर्न सबर्ब्स संघाकडून खेळताना षटकार आणि चौकारांचा पाऊस पाडत पहिले त्रिशतक झळकावले.

सिडनी क्रिकेट क्लब संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात हरजस सिंग तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. यादरम्यान फलंदाजी करताना त्याने ७४ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. शतकानंतर त्याच्या फलंदाजीचे रौद्ररूप पहायला मिळाले. त्याने ६७ चेंडूत २१४ धावा चोपून काढल्या. या सामन्यात ५० षटकांअखेर




त्याने १४१ चेंडूंचा सामना करत ३१४ धावांची विक्रमी खेळी केली. यात त्याने ३५ गगनचुंबी षटकार मारले.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्टर्न सबर्ब्स संघाने ५० षटकांअखेर पाच गडी बाद ४८३ धावा केल्या. यादरम्यान ३१४ धावा या एकट्या हरजस सिंगने केल्या होत्या. यासह तो ग्रेड लेव्हल क्रिकेटमध्ये वनडे क्रिकेटमध्ये त्रिशतकी खेळी करणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे.

हरजस सिंगचा जन्म ऑस्ट्रेलियात झाला आहे, पण त्याचे आई- वडील भारतीय आहेत. २०००मध्ये त्याचे आई-वडील सिडनीत स्थलांतरीत झाले होते. याआधी भारताविरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या अंडर १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेतही त्याने दमदार कामगिरी केली होती. या सामन्यात त्याने ५५ धावांची खेळी केली होती.

# डब्ल्यूटीसी क्रमवारीत टीम इंडियापेक्षा श्रीलंका भारी!

## चार मॅचनंतरही विंडीजची पाटी कोरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमव रंगलेल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने तिसऱ्या दिवशीच कॅरेबियन पाहण्यांचा खेळ खल्लास केला. दोन्ही संघातील कसोटी मालिका ही जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेचा भाग आहे.

गुणतालिकेत ऑस्ट्रेलियन संघ अव्वलस्थानी आहे. आतापर्यंत त्यांनी तीन कसोटी सामन्यातील तीन विजयांसह ३६ गुण आपल्या खात्यात जमा केले आहेत. १०० टक्के विनिंग पर्सेंटेजसह ते अव्वलस्थानी आहेत. इथं श्रीलंकेचा संघ अजूनही टीम इंडियावर भारी ठरतोय. दोन कसोटी सामन्यातील एक विजय आणि एक अनिर्णित सामन्यासह त्यांच्या खात्यात ६६.६७ विनिंग पर्सेंटेजसह १६ गुण जमा आहेत.

भारतीय संघाने इंग्लंड दौऱ्यातील तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी स्पर्धेतून डब्ल्यूटीसी मोहिमेला सुरुवात केली.




पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाने २-२ बरोबरीचा डाव साधला होता. वेस्ट इंडिज विरुद्धच्या लढतीनंतर सहा सामन्यातील तीन विजय दोन पराभव आणि एक अनिर्णित सामन्यासह भारतीय संघ ५५.५६ विनिंग पर्सेंटेजसह ४० गुण खात्यावर जमा करून तिसऱ्या स्थानावर आहे.

इंग्लंडचा संघ पाच सामन्यानंतर दोन विजय, दोन पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह ४३.३३ विनिंग पर्सेंटेजसह २६ गुण मिळवत चौथ्या, बांगलादेशचा संघ दोन सामन्यातील एक पराभव आणि एक अनिर्णित सामन्यासह चार गुण मिळवत १६.६७ विनिंग पर्सेंटेजसह पाचव्या स्थानावर आहे.

वेस्ट इंडिजचा संघाने आतापर्यंत खेळलेले चारही सामने गमावले असून त्यांना अद्याप खातेही उघडता आलेले नाही. याशिवाय दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान संघाने अजून आपल्या मोहिमेची सुरुवात केलेली नाही.

# हरमनप्रीतने पाक कर्णधारासोबत हस्तांदोलन टाळले

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये रविवारी (दि.५) महिला एकदिवसीय विश्वचषकाचा सामना खेळवला गेला. आशिया चषकातील सर्व सामन्यांमध्ये भारताच्या पुरुष संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधाराशी आणि संघातील इतर खेळाडूंशी हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला होता. महिला संघानेदेखील त्याचीच पुनरावृत्ती केली आहे.

कोलंबो येथील प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या सामन्यात भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेकीदरम्यान पाकिस्तानची महिला कर्णधार फातिमा सनाबरोबर हस्तांदोलन केले नाही. एका अहवालानुसार दोन्ही संघांच्या कर्णधारांनी रविवारी नाणेफेकीदरम्यान हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे भारत आणि पाकिस्तानच्या पुरुष संघांमधील सामन्यांमध्ये दिसणारी परंपरा कायम ठेवण्यात आली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com